दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१३४ | सोमवार दि.०३ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# नदीपात्रातील गाळ शेतकऱ्यांना मोफत !

## ● गाळ, वाळू, दगडांच्या विल्हेवाटीसाठी सरकारची मार्गदर्शक तत्त्वे जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील नद्यांची वहन क्षमता वाढविणे, पूरस्थितीचा धोका कमी करणे आणि नदीपात्रातील गाळाचा योग्य वापर सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारने नदीपात्रातून काढण्यात येणाऱ्या गाळ, माती, वाळू, दगड आणि गोट्यांच्या विल्हेवाटीबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. या निर्णयामुळे नदी खोलीकरणाच्या कामांना गती मिळण्याबरोबरच शेतकऱ्यांना गाळ मोफत उपलब्ध होणार असून, सार्वजनिक कामांसाठीही दगड व गोट्यांचा वापर करता येणार आहे.**



महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ मधील तरतुदीनुसार नदीपात्रातील अडथळे दूर करण्याचे अधिकार जलसंपदा विभागाकडे आहेत. राज्यातील प्रमुख नद्यांच्या सुमारे १ हजार ६४८ किलोमीटर नागरी व शहरी पट्ट्यात लाल व निळ्या पूररेषा निश्चित करण्यात आल्या असून, पूरस्थिती कमी करण्यासाठी नदीपात्रातील गाळ काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. नव्या शासन निर्णयानुसार नदीपात्रातून बाहेर काढण्यात येणारा गाळ, माती, गाळमिश्रित वाळू, दगड आणि गोटे यांचे स्वतंत्र वर्गीकरण करून त्यांचे मोजमाप केले जाईल. त्यानंतर हा साठा महसूल विभागाच्या ताब्यात दिला जाणार असून जिल्हाधिकाऱ्यांनी त्यासाठी योग्य शासकीय जागा उपलब्ध करून द्यायची आहे. संपूर्ण साठ्याची नोंद महाखनिज प्रणालीमध्ये करण्यात येणार आहे. खोलीकरणातून मिळणारा गाळ आणि माती संबंधित तालुक्यातील शेतकऱ्यांना प्राधान्याने मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गाळाची वाहतूक मात्र शेतकऱ्यांना स्वतःच्या खर्चाने करावी लागणार असून त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून शून्य रॉयल्टीचे पास दिले जातील. दरम्यान, ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### पत्रकार परिषदेतच खा.पप्पू यादवांवर चाकू हल्ला

दिल्लीः काँग्रेस खासदार पप्पू यादव यांना मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दिल्ली येथील आयोजित पत्रकार परिषदेत काहीजण अचानक आले आणि पप्पू यादव यांना मारहाण करू लागले. माझ्या हत्येचा कट रचण्यात आला असा आरोप त्यांनी केला आहे. तसेच हल्लेखोर चाकू घेऊन आले होते. ते माझा खून करणार होते. असा ही आरोप त्यांनी केला. माध्यमांशी बोलत असताना पप्पू यादव हे मोठ्या प्रमाणात घाबरलेले दिसले. संसद परिसरात विरोधी पक्षाने राम मंदिर दान चोरी प्रकरणी आंदोलन केले होते, याच आंदोलनात त्यांनी पूजाऱ्याची वेशभूषा परिधान करत सरकारचा निषेध केला होता.

### राजकारणापेक्षा शेतकऱ्यांचे हित महत्वाचे–मुख्यमंत्री

'बंगळुरूः राज्यातील जनतेचा राजकीय मतभेद बाजूला सारून आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी एकजूट राहण्याचा इतिहास असल्याचे कर्नाटकचे मुख्यमंत्री डी के शिवकुमार यांनी सर्वपक्षिय नेत्यांच्या बैठकीत सांगितले. कावेरी जल नियमन समितीने १५ दिवसांसाठी दररोज ३,५०० क्युसेक पाणी सोडण्याचे निर्देश दिल्यानंतर, तामिळनाडूसोबतच्या कावेरी पाणीवाटप वादावर राज्याची कायदेशीर आणि राजकीय रणनीती आखण्यासाठी बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत वक्तव्य केले. या निर्देशांना नंतर कावेरी जल व्यवस्थापन प्राधिकरणाने देखील मान्यता दिली होती. मुख्यमंत्री डी के शिवकुमार पुढे बोलताना म्हणाले की, कावेरी वाद हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे आणि आपण सर्वजण त्याच्यासोबतच मोठे झालो आहोत.राजकारणापेक्षा राज्यातील शेतकरी आणि लोकांचे हित अधिक महत्त्वाचे असल्याचेही यावेळी सांगितले.

### सुभाष चंद्रा, गोयंका यांना शेअर बाजारात बंदी

नवी दिल्लीः भांडवली बाजार नियामक सेबीने झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस लिमिटेड (झील) कंपनीवर दोन महिन्यांसाठी भांडवली बाजारात सहभागी होण्यास बंदी घातली आहे. तसेच कंपनीचे चेअरमन एमेरिटस सुभाष चंद्रा आणि व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी पुनीत गोयंका यांना एक वर्षासाठी बाजारातून प्रतिबंधित करण्यात आले आहे. हैदराबादमधील कंपनीची जमीन प्रमोटर समूहाशी संबंधित कंपन्यांच्या कर्जासाठी परवानगीशिवाय गहाण ठेवल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. सेबीने तिघांवर एकूण १.४८ कोटी रुपयांचा दंडही ठोठावला आहे. त्यामध्ये झीलवर ३० लाख रुपये, सुभाष चंद्रा यांच्यावर ६० लाख रुपये आणि पुनीत गोयंका यांच्यावर ५८ लाख रुपयांचा दंड आहे. सेबीच्या आदेशानुसार, डिसेंबर २०१८ मध्ये झीलच्या हैदराबाद येथील मालमत्तेची मूळ कागदपत्रे इंडियाबुल्स हाउसिंग फायनान्स लिमिटेडकडे एस्सेल समूहाशी संबंधित कंपन्यांनी घेतलेल्या कर्जाच्या हमीसाठी जमा करण्यात आली होती.

# राममंदिर देणगी चोरी प्रकरणी २०० जणांना नोटिसा !



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

अयोध्या येथील श्री राम मंदिर देणगी चोरी प्रकरणाच्या तपासाला आता गती आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थापन करण्यात आलेल्या नवीन विशेष तपास पथकाने या प्रकरणाचा तपास गतिमान केला आहे. तपासाच्या या नव्या टप्प्यात एसआयटीने तब्बल २०० हून अधिक जणांना चौकशीसाठी नोटिसा बजावली आहे.

अयोध्या येथील श्री राम मंदिर देणगी चोरी प्रकरणाच्या तपासाची व्याप्ती आता वाढवली गेली आहे. एसआयटीने मंदिर परिसरातील दान मोजणी प्रक्रिया, सुरक्षा व्यवस्था आणि इतर दैनंदिन व्यवस्थापनाशी संबंधित सुमारे २०० कर्मचाऱ्यांना व संबंधित व्यक्तींना चौकशीसाठी हजर राहण्याच्या नोटिसा पाठवल्या आहेत. या सर्व घटकांची कसून चौकशी केली जात असून देणगी प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याचा बारकाईने आढावा घेतला जात आहे. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाची घडामोडी म्हणजे ट्रस्टचे राजीनामा दिलेले माजी पदाधिकारी चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनाही नवीन एसआयटीने पुन्हा नोटीस बजावली आहे. त्यामुळे या दोन्ही माजी उच्चपदस्थ पदाधिकाऱ्यांची एसआयटीकडून कोणत्याही क्षणी चौकशी होणार ▶▶ पान २ वर

# मंत्री शिरसाट अन् आ.बच्चू कडू अभिजीत दिपकेंना भेटल्याने महायुतीत नाराजी

## शिंदे भडकले तर भाजपा नेते चिडले

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर अभिजीत दिपके हे त्यांच्या मूळ गावी छत्रपती संभाजीनगर येथे परतले, त्यानंत शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये अभिजीत दिपके यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबाची भेट घेतली. त्यानंतर शिवसेनेचे नेते आमदार बच्चू कडू यांनीही त्यांच्या घरी जाऊन दिपके यांची भेट घेतली.



मात्र या भेटीवरून आता महायुतीत नाराजी पसरली असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे चांगलेच भडकले असल्याचे सांगण्यात येत आहे तर यावर भाजपा नेते भडकले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

''अभिजीत दीपके यांची, बच्चू कडू यांनी भेट घेतली, संजय शिरसाट यांनी भेट घेतली, त्यावरून आता महायुतीत थेट नाराजी झालेली आहे, याच्यावर रोहित पवारांनी म्हटले की, आता खरंच ते स्वतःच्या डोक्याने तिथे गेले होते, का एकनाथ शिंदे साहेबांनी त्यांना पाठवले होते, हे ▶▶ पान २ वर

# तर पत्नीला अंतरीम पोटगी नाकारता येऊ शकते–हायकोर्ट



**दिल्ली । वृत्तसंस्था**

पत्नी व्यभिचारात राहत असल्याचे पतीकडून स्पष्टपणे सिद्ध झाल्यास, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत पत्नीला अंतरीम पोटगी नाकारली जाऊ शकते, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. तथापि, न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, व्यभिचाराचा आरोप प्राथमिक दृष्ट्या आणि पुराव्यांच्या आधारे स्पष्टपणे सिद्ध झाला पाहिजे; तरच अंतरीम पोटगीवरील कायदेशीर बंदी लागू होईल.

बार अँड बेंचने दिलेल्यावृत्तानुसार, संबंधित पती–पत्नीचा विवाह जुलै २०१४ मध्ये झाला होता. काही वर्षांनंतर त्यांच्या संबंधांत वाद निर्माण झाल्याने मे २०२० मध्ये पत्नी आपल्या मुलासह वेगळी राहू लागली. नोव्हेंबर २०२० मध्ये तिने उदयपूर न्यायालयात सीआरपीसी कलम १२५ अन्वये पोटगी व अंतरीम पोटगीसाठी अर्ज दाखल केला. या सुनावणीदरम्यान, ▶▶ पान २ वर

# केवळ मतदान म्हणजे लोकशाही नव्हे, जागरूक नागरिकत्व महत्त्वाचे–तुकाराम मुंढे

**अमरावती । प्रतिनिधी**

केवळ ८० टक्के मतदान होणे म्हणजेच लोकशाही नव्हे; तर ज्या लोकशाहीत नागरिक जागरूक असतात, तीच लोकशाही खऱ्या अर्थाने टिकते, असे प्रतिपादन प्रामाणि४क, शिस्तप्रिय प्रशासकीय अधिकारी आयएएस तुकाराम मुंढे यांनी केले. अमरावती येथील पोटे इस्टेटमधील स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजित संवाद तरुणाईशी या विशेष कार्यक्रमात ते तरुणांशी संवाद साधताना बोलत होते.



कार्यक्रमादरम्यान त्यांनी स्पर्धा परीक्षा, करिअर नियोजन, प्रशासकीय अनुभवांसोबतच लोकशाही, सामाजिक जबाबदारी आणि सोशल मीडियाच्या प्रभावावर अत्यंत अभ्यासपूर्ण व रोखठ४नोक मते मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिला. जर हा अधिकार नसता, तर आपल्याला हवे ते शासन निवडता आले असते का, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. ऑफ़ द पीपल, बाय द पीपल अँड फॉर द पीपल ही अब्राहम लिंकन यांनी केलेली लोकशाहीची व्याख्या सांगत, आपण ▶▶ पान २ वर

# भारतात समान नागरी कायद्याची गरज

**कोलकाता । वृत्तसंस्था**

निर्वासित बांगलादेशी लेखिका तस्लीमा नसरीन यांनी भारतात समान नागरी कायदा लागू करण्याची जोरदार मागणी केली आहे. विशेषतः महिलांवरील भेदभाव दूर करण्यासाठी असा कायदा अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यासोबतच बांगलादेश आणि पाकिस्तानातही समान नागरी कायद्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



कोलकाता येथील पत्रकार परिषदेत ६३ वर्षीय नसरीन म्हणाल्या, सर्व प्रगत देशांमध्ये युसीसीसारखे कायदे आहेत. बांगलादेश, पाकिस्तान आणि भारताला समान नागरी कायद्याची गरज आहे. सर्वांसाठी समान कायदा असायला हवा. महिलांना मोठ्या प्रमाणावर भेदभावाचा सामना करावा लागतो, जो समान नागरी कायद्यामुळे ▶▶ पान २ वर

# राज्यभरात पावसाची विश्रांती, १५ ऑगस्टनंतर पुन्हा जोर वाढणार

**मुंबई । प्रतिनिधी**

संपूर्ण राज्यात जोरदार हजेरी लावल्यानंतर आता पावसासंदर्भात हवामान विभागाने एक महत्वाचा अंदाज व्यक्त केला आहे. ऑगस्टच्या सुरुवातीला पाऊस काहीशी विश्रांती घेणार असल्याची माहिती आहे. तर ऑगस्टच्या पहिल्या १५ दिवसांमध्ये पाऊस ब्रेक घेणार असून, त्यानंतर (१६ ऑगस्टनंतर) राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान अभ्यासकांनी वर्तवली आहे. तर 'एल निनो'चा प्रभाव वाढण्याची शक्यता असून ऑगस्ट–सप्टेंबर या दोन महिन्यांत देशात सरासरीच्या ९४ टक्क्यांपेक्षा कमी पावसाचा अंदाज देखील वर्तविण्यात ▶▶ पान २ वर

# कोट्यावधीचा घरकुल वाळू घोटाळा आर्थिक गुन्हे शाखेकडून माफियांना नोटीसा

**बीड / गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन येथे गोदावरी नदी पात्रातून तब्बल २५,६४२ ब्रास अवैध वाळूचा उपसा केल्याप्रकरणी आणि घरकुल लाभार्थ्यांच्या नावाचा गैरवापर केल्याप्रकरणी एक खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेकडून कसून तपास सुरू असून, संबंधितांना नोटीस बजावण्यात आली आहे.

फिर्यादी संजय दत्तात्रय सोनवणे (वय ५०, व्यवसाय: नायब तहसीलदार, गेवराई) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपींनी आपसात संगनमत करून राक्षसभुवन येथे अवैध वाळू घाट तयार केला. घरकुल मंजूर लाभार्थ्यांना मोफत ५ ब्रास वाळू देण्याच्या नावाखाली लाभार्थ्यांकडून ओटीपी घेण्यात आले. या ओटीपीच्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.०१ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: १००.०० क्विंटल | | |
| २,६१५ | २,७८१ | २,६८५ |
| ज्वारी/हायब्रिड :६६.५० क्विंटल | | |
| २,२८० | ३,३२० | २,८७० |
| मका/लोकल: २०.०० क्विंटल | | |
| २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| तूर : २.०० क्विंटल | | |
| ७,६०१ | ७,६०१ | ७,६०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३२.०० क्विंटल | | |
| २,५०१ | ३,०३२ | २,७९५ |
| मुग: ४१.५० क्विंटल | | |
| ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | | |
| ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| हरभरा: १.०० क्विंटल | | |
| ४,८५१ | ५,५८० | ५,२१५ |

# दोन्ही राष्ट्रवादीचा संसार मोडण्याच्या मार्गावर !

## भैय्यासाहेबांना बीड अन बीडकरांना पंडित सहा महिन्यातच कळाले !

फ्रोकस...

**विशेष प्रतिनिधी । बीड**

**गेल्या सहा महिन्यापूर्वी स्व.अजितदादा पवार यांच्यावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात विजयसिंह पंडित अमरसिंह पंडित यांच्या माध्यमातून नगरपालिका दिली आणि महायुतीत सहकारी असलेल्या भाजपाला सत्तेच्या बाहेर ठेवले. एक प्रकारे पंडितांनी दोन्ही क्षीरसागर बंधूंना सत्तेपासून दूर ठेवले, मात्र ही सत्ता मिळाल्याचा आनंद फार काळ टिकवता आला नाही. सत्ताधाऱ्यांमध्येच फूट पडल्याने आगामी काळात राजकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



बीड नगरपरिषदेच्या राजकारणात मोठा भूकंपाचा झटका बसला असून, अवघ्या सहा महिन्यांपूर्वी थाटलेला राजकीय संसार आता मोडकळीस येण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) अंतर्गत वाढलेला अंतर्गत कलह आणि सत्तासंघर्ष यामुळे बीडच्या राजकारणात पुन्हा एकदा नव्या समीकरणांची चर्चा रंगू लागली आहे. बीड नगरपालिकेत सध्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची सत्ता असली, तरी अवघ्या सहा महिन्यांतच पक्षात मोठी दुफळी निर्माण झाली आहे. गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी बीड नगरपालिकेच्या कारभारात लक्ष घालण्यास सुरुवात केली होती. मात्र, आर्थिक देवाणघेवाण ▶▶ पान २ वर



**पक्षीय बलाबल**

| | |
|---|---|
| घड्याळ | १९ |
| कमळ | १५ |
| तुतारी | १३ |
| धनुष्यबाण | ०३ |
| मशाल | ०१ |
| पतंग | ०१ |

अग्रलेख

# अजित डोभाल की मोदी-शाह यांचा 'नॅरेटिव्ह'?

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल हे देशातील सर्वाधिक विश्वासार्ह आणि प्रभावशाली प्रशासकीय अधिकाऱ्यांपैकी एक मानले जातात. दहशतवादविरोधी कारवाया, गुप्तचर यंत्रणांतील अनुभव आणि राष्ट्रीय सुरक्षेतील योगदानामुळे त्यांनी जनमानसात एक ठाम राष्ट्रवादी प्रतिमा निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक सार्वजनिक वक्तव्याकडे केवळ एका अधिकाऱ्याचे वैयक्तिक मत म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. याच पार्श्वभूमीवर 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' स्वीकारताना त्यांनी केलेले ''हक्कांचा अतिरेक आणि कर्तव्यांचा विसर'' हे विधान चर्चेचा विषय ठरले. शिस्त, जबाबदारी आणि कर्तव्य यांचा संदेश निःसंशयपणे महत्त्वाचा आहे. परंतु हा संदेश ज्या राजकीय वातावरणात दिला गेला, त्या संदर्भामुळे काही प्रश्न उपस्थित होतात.

गेल्या काही वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नागरिकांच्या कर्तव्यांवर, राष्ट्रहितावर आणि शिस्तीवर सातत्याने भर दिला आहे. त्याच काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आंदोलने, विद्यार्थी चळवळी, शेतकरी आंदोलन आणि सरकारवरील टीका यांबाबत देशात तीव्र राजकीय वाद झाले आहेत. अशा परिस्थितीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराच्या भाषणातील शब्द आणि सत्ताधारी नेतृत्वाच्या सार्वजनिक भूमिकांमध्ये साधर्म्य दिसल्यास त्याबद्दल चर्चा होणे स्वाभाविक आहे. मात्र, हेही तेवढेच स्पष्ट केले पाहिजे की, डोभाल यांनी हे विचार कोणाच्या राजकीय निर्देशानुसार मांडले किंवा त्यांचा उद्देश एखाद्या पक्षाच्या प्रचाराला हातभार लावणे होता, असे सिद्ध करणारा कोणताही सार्वजनिक पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे अशा दाव्यांऐवजी अधिक योग्य प्रश्न असा आहे की, अशा भाषणांना राजकीय पातळीवर अर्थ कसा लावला जातो आणि त्याचा सार्वजनिक चर्चेवर काय परिणाम होतो? लोकशाहीत नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये ही एकमेकांची प्रतिस्पर्धी संकल्पना नाहीत. भारतीय संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार दिले आहेत, तर मूलभूत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे. परंतु लोकशाहीचा समतोल तेव्हाच टिकतो, जेव्हा सरकारही आपल्या घटनात्मक कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करते. रोजगार, शिक्षण, कायद्याचे राज्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि उत्तरदायी प्रशासन ही राज्याची जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिकांच्या कर्तव्यांइतकीच सत्तेच्या कर्तव्यांवरही चर्चा व्हायला हवी. अजित डोभाल यांची प्रतिमा ही राजकीय नेत्यांपेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य देणाऱ्या अधिकाऱ्याची आहे. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याला सामान्य राजकीय भाषणापेक्षा अधिक नैतिक विश्वासार्हता लाभते. राजकीय विश्लेषकांचे मत आहे की, अशा विश्वासार्ह व्यक्तींकडून व्यक्त होणारे विचार सार्वजनिक मतमतांतरे घडविण्यावर प्रभाव टाकू शकतात. मात्र, त्याचा अर्थ असा होत नाही की ते एखाद्या राजकीय अजेंड्याचा भाग आहेत; हा निष्कर्ष काढण्यासाठी पुरेसा पुरावा आवश्यक असतो. आजच्या काळात देशभक्तीची व्याख्या अनेकदा राजकीय चर्चेचा विषय बनते. सरकारला प्रश्न विचारणे, आंदोलने करणे किंवा असहमती व्यक्त करणे हे लोकशाहीतील घटनात्मक अधिकार आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्रहित, सामाजिक शिस्त आणि नागरिकांची जबाबदारी यांचीही महत्त्व आहे. या दोन्ही मूल्यांमध्ये संघर्ष नसून संतुलन असणे आवश्यक आहे.

लोकमान्य टिळकांनी ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे'' असे सांगितले, तेव्हा त्यांनी अधिकार आणि जबाबदारी यांना परस्परपूरक मानले होते. म्हणूनच त्यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्काराच्या मंचावर ''कर्तव्य'' या संकल्पनेवर भर दिला जात असताना ''हक्क'' या संकल्पनेचे महत्त्वही तेवढ्याच ताकदीने अधोरेखित होणे आवश्यक आआहे. की, अत्यंत विश्वासार्ह सार्वजनिक व्यक्तींच्या विधानांचा राजकीय अर्थ कसा लावला जातो आणि त्यांचा उपयोग विविध राजकीय कथनांना बळ देण्यासाठी केला जातो का? हा प्रश्न विचारणे लोकशाहीविरोधी नसून, लोकशाहीच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. कोणतीही व्यक्ती, कितीही लोकप्रिय किंवा सन्माननीय असली तरी तिच्या सार्वजनिक विधानांवर चिकित्सक चर्चा होणे हेच प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण आहे.

## मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्सच्या नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन

### बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे



**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारिणीच्या निवडणुकीत अध्यक्षपदी सुरेंद्रजी रेदासनी, महासचिवपदी संदीपजी लाहोटी आणि सचिवपदी जफरशेट यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे यांनी त्यांचे अभिनंदन केले.**

अशोक शेटे यांनी की, मराठवाड्यातील उद्योग, व्यापार आणि उद्योजकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करणाऱ्या मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्सच्या नूतन नेतृत्वाकडून व्यापारी व औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास आहे. व्यापार क्षेत्रातील समन्वय, उद्योगवाढ आणि व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी नव्या कार्यकारिणीचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्सच्या नूतन पदाधिकाऱ्यांना यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा देत, त्यांच्या नेतृत्वाखाली व्यापारी हिताचे विविध उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविले जातील, असा विश्वासही अशोक शेटे यांनी व्यक्त केला.

## मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्काराने लक्ष्मण वाघमारे सरांचा गौरव

**वडवणी । प्रतिनिधी**

**आपुलकी व आस्था सेवाभावी संस्था, सेलू (जि. परभणी) यांच्या वतीने सन २०२५-२६ चा मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद प्राथमिक.शाळा, ढोरवाडी ता. वडवणी, जि. बीड येथील कर्तव्यदक्ष शिक्षक श्री.लक्ष्मण वाघमारे यांना प्रदान करण्यात आला.**

हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन मा. गोविंदराव नांदेड साहेब(मा.शिक्षण संचालक,पुणे), श्री.संजय ससाने (शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद परभणी), श्री.शैलेश लाहोटी (उपजिल्हाधिकारी, परभणी), श्री.मिलिंद सावंत (नगराध्यक्ष, सेलू) संयोजक शिवशंकर मोरे सर यांच्या यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. वडवणी तालुक्यातील ढोरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक श्री लक्ष्मण वाघमारे हे गेल्या वीस वर्षापासून शिक्षण क्षेत्रातील समर्पित सेवा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य तसेच लोकसहभाग आणि समाजाभिमुख उपक्रम, विद्यार्थी गुणवत्ता यांची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना देण्यात आला. या यशाबद्दल वडवणी तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षणप्रेमी, विविध सामाजिक संघटना तसेच नागरिकांकडून श्री. लक्ष्मण वाघमारे यांच्यावर अभिनंदनचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. तसेच त्यांना वडवणीचे लोकप्रिय गटशिक्षणाधिकारी मा. राहुलजी भट्टी साहेब, श्री सतीश वाघमारे(संपादक सा. लोकमानस), वडवणी बॉईजचे केंद्रप्रमुख श्री.नितीन डोंगरदिवे, केंद्रीय मुख्याध्यापक श्री बापू धनवे, श्री सुनील मुंडे (चेअरमन) माजी केंद्रप्रमुख श्री. गणेश धायतीडक, श्री लक्ष्मण बहिरवाळ (जिल्हाध्यक्ष), श्री निलेश चव्हाण (तालुकाध्यक्ष) श्री अशोक भिलारे, श्री ज्ञानेश्वर वाव्हाळ, श्री. रामचंद्र मुंडे, श्री.सुरेश मुंडे, श्री सुप्रीम वंजारे, श्री सुरेश वाघमारे, श्री नामदेव प्रभाळे, श्री सचिन डावकर, श्री राजू दास राठोड, श्री कैलास दुधाने, श्री सावन उजगरे यांच्यासह शिक्षक मित्र परिवाराने पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशउपाध्यक्षपदी प्रतिक कांबळे यांची पदोन्नती!

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघात उल्लेखनीय कार्याची दखल घेत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष वसंतजी मुंडे तसेच राज्य समन्वयक संतोषजी मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली प्रतिक कांबळे यांची प्रदेशउपाध्यक्ष पदी पदोन्नती करून नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी प्रतिक कांबळे यांनी बीड शहराध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करत विविध उपक्रमांमध्ये आपले योगदान दिले. त्यांच्या कार्याची दखल घेत संघटनेने काल दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्यावर अधिक मोठी जबाबदारी सोपवत प्रदेशउपाध्यक्षपदाची नियुक्ती जाहीर केली आहे. प्रतिक कांबळे यांनी पत्रकारिता क्षेत्रात आपल्या अभ्यासपूर्ण, निर्भीड आणि वस्तुनिष्ठ लेखनातून अल्पावधीतच वेगळी ओळख निर्माण केली आहे. तसेच शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत समाजाभिमुख कार्य केले आहे. संघटनेच्या विस्तारासाठी, पत्रकारांच्या हितासाठी आणि राज्यभर संघटन अधिक बळकट करण्यासाठी प्रतिक कांबळे यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष वसंतजी मुंडे तसेच राज्य समन्वयक संतोषजी मानूरकर यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. प्रतिक कांबळे यांच्या प्रदेशउपाध्यक्षपदी झालेल्या पदोन्नतीबद्दल पत्रकार, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.



## विद्युत तारांचा धक्का लागलेला दोन जनावरे जागीच ठार

### चकलांबा येथील दुर्घटना

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या लोंबकलेल्या तारांचा धक्का लागल्याने दोन मुक्या जनावरांचा जीव गेल्याची दुर्घटना गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील पंचालेश्वर वस्तीजवळ घडली. याप्रकरणी चौकशी करून भरपाई देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.**

याप्रकरणी माहिती अशी अशी की, चकलांबा येथील पंचालेश्वर वस्तीजवळ सिंगल फेज लाईट मागील काही वर्षांपासून टाकण्यात आली आहे. येथील विद्युत तारा अनेक दिवसापासून लोंबकलेल्या आहेत. या प्रकरणी तोंडी सांगूनही दखल घेण्यात आली नव्हती. शनिवार दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी या जमिनीपासून अत्यंत कमी अंतरावर असलेल्या तारांचा धक्का लागल्याने एक गाय आणि एक बैल अशी दोन जनावरे जागीच ठार झाली आहेत. येथील शेतकरी आदिनाथ अर्जुन खेडकर यांच्या मालकीची ही जनावरे होती. मुक्या जनावरांच्या जीव गेल्याने हळहळ व्यक्त करून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



## शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अ‍ॅड.चंद्रकांत नवले यांच्या उपस्थितीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन!

**बीड । प्रतिनिधी**

**साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त गेवराई तसेच बीड येथे आयोजित भव्य मिरवणुकीत सहभागी होऊन ३त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.**

यावेळी आ. विजयराजे पंडित, अजिंक्य भैय्या चांदणे, भाऊसाहेब जरांगे पाटील, गेवराई शहरप्रमुख मुकेश महाजन, गणेश पवार, राजेंद्र मोरे पाटील, दादा हातागळे विनोद हातागळे, भारत भाऊ कांबळे, भास्करराव चांदणे , रामभाऊ चांदणे सर, चव्हाण मामा, प्रेम तांगडे यांच्यासह असंख्य समाजबांधव, शिवसैनिक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव'' या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या क्रांतिकारी विचारांचा वारसा समाजाला सदैव प्रेरणा देत राहील.



## पान १ वरून...

### नदीपात्रातील गाळ

नदीपात्रातून मिळणारे दगड आणि गोटे यांचा वापर प्राधान्याने पाणंद रस्ते, शासकीय बांधकामे तसेच इतर सार्वजनिक विकासकामांसाठी केला जाणार आहे. पर्यावरण परवानगी नसलेल्या प्रकल्पांतून मिळणारी वाळू प्रथम घरकुल योजनांतील पात्र लाभार्थ्यांना मोफत देण्यात येईल. तर पर्यावरण परवानगी असलेल्या प्रकल्पांमधील वाळूचा व्यावसायिक वापर करण्यास परवानगी असेल; मात्र त्यासाठी रॉयल्टी, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी आणि इतर लागू शुल्क भरावे लागणार आहे. व्यावसायिक वापरासाठी साठवणूक, वाहतूक आणि विक्री प्रक्रियेवर सरकारने कडक नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सीसीटीव्ही, जीपीएस, बारकोडयुक्त पास आणि महाखनिज प्रणालीच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन देखरेखीखाली राहणार आहे. बेकायदा उत्खनन, वाहतूक किंवा विक्री आढळल्यास संबंधित ठेकेदारांवर महसूल कायद्यानुसार दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

--------------

### मंत्री शिरसाट अन् आ.बच्चू कडू अभिजीत

आपल्याला सांगता येणार नाही. पण राहिला प्रश्न अभिजीत दीपके यांचा. तर ते ना महायुतीच्या कुठल्या पक्षामध्ये, ना भाजपमध्ये जाणार आहेत, त्यामुळे काहीही, कितीही प्रयत्न केला, तर ते महायुतीच्या विचाराबरोबर काम करतील असे मला तरी वाटत नाही, असेही पुढे रोहित पवारांनी म्हटले आहे. दुसरीकडे अभिजीत दिपके यांना भेटण्यासाठी परस्पर का गेलात? अशी विचारणा आता एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडू आणि संजय शिरसाट यांच्याकडे केली आहे. महायुतीची भूमिका ठरलेली नसताना अशाप्रकारे न विचारता अभिजीत दिपके यांची भेट घ्यायला नको होती असेही यावेळी एकनाथ शिंदे यांनी म्हटले असल्याचे सांगितले जात आहे. महायुतीतील घटक पक्ष म्हणून संवेदनशील राजकीय घडामोडींमध्ये समन्वय राखणे आवश्यक असताना स्वतंत्र भूमिका घेणे योग्य नसल्याचेही शिंदे यांनी स्पष्ट केल्याची चर्चा आहे. दुसरीकडे यामुळे शिंदे शिवसेना आणि भाजपा दरम्यान नाराजी पसरल्याचे सांगितले जात आहे. भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. विरोधी पक्ष विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर राजकीय पोळी भाजत आहेत, हे समजू शकतो. मात्र, महायुती सरकारमध्ये सहभागी असलेले शिरसाट आणि कडू यांच्यासारखे नेते जर अभिजित दीपके यांच्या घरी जाऊन भेट घेत असतील, तर त्यातून जनतेमध्ये चुकीचा संदेश जातो, असे दरेकर म्हणाले. ज्या अ३ांदोलनातून केंद्र सरकारची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न झाला, त्याच आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीची भेट घेणे हे महायुतीच्या भूमिकेशी सुसंगत नाही. त्यामुळे शिरसाट आणि कडू यांनी आपल्या भूमिकेबाबत जनतेसमोर स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी दरेकर यांनी केली.३

--------------

### राममंदिर देणगी चोरी प्रकरणी २००

आहे. पूर्वतपासात राहिलेले दुवे शोधण्यासाठी ही चौकशी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. श्री राम मंदिरातील देणगीच्या रकमेत नेमका किती आणि कसा गैरव्यवहार झाला, याचा शास्त्रीय आणि कायदेशीर पुरावा गोळा करण्यासाठी एसआयटीने विशेष रणनीती आखली आहे. या तपासात आता चार्टर्ड अकाउंटंट्स म्हणजेच फॉरेन्सिक ऑडिट तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.मंदिराच्या सर्व आर्थिक नोंदी, जमा-खर्च आणि बँकेचे व्यवहार यांचे फॉरेन्सिक ऑडिट केले जाणार आहे. यामुळे नेमका देणगी चोरी कशी झाली याची सखोल माहिती समोर येणार आहे. प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी आतापर्यंत सर्व आठही आरोपींना पोलिस कोठडीत घेऊन त्यांची सखोल चौकशी केली आहे, तसेच तपासादरम्यान महत्त्वाचे पुरावेही जप्त केले आहेत. यापूर्वी उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) या प्रकरणाचा तपास करून सर्वोच्च न्यायालयात आपला स्टेटस रिपोर्ट (तपास अहवाल) सादर केला होता. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाचा तपास एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली करण्याचे निर्देश दिले होते.

-----------

### भारतात समान नागरी कायद्याची गरज

दूर केला जाऊ शकतो. हा कायदा अत्यंत आवश्यक आहे. बांगलादेशचा उल्लेख करताना नसरीन म्हणाल्या की, समता हा कोणत्याही सभ्यतेचा पाया असतो, परंतु आजही अनेक महिलांना भेदभावाला सामोरे जावे लागत आहे. बांगलादेशात हिंदू महिलांना समान हक्क नाहीत. त्या त्यांच्या वडिलांच्या मालमत्तेत हक्क सांगू शकत नाहीत. जर हिंदू महिलांना स्वातंत्र्य आणि समान हक्क मिळवून द्यायचे असतील तर समान नागरी कायदा लागू करणे गरजेचे आहे. जवळपास १९ वर्षांनंतर कोलकात्यात परतलेल्या नसरीन यांचा शनिवारी रवींद्र सदन येथे राज्य सरकारच्या एका सांस्कृतिक कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. २००७ मध्ये त्यांच्या द्विखंडितो या पुस्तकाच्या प्रकाशनावरून झालेल्या तीव्र निदर्शनांमुळे तत्कालीन डाव्या आघाडीच्या सरकारला त्यांना शहरातून हलवावे लागले होते. सत्कार समारंभात झालेल्या गदारोळावर नसरीन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले. प्रसिद्ध कवी जॉय गोस्वामी यांना प्रेक्षकांच्या एका गटाच्या विरोधामुळे भाषण न करताच व्यासपीठ सोडावे लागल्याने आपल्याला अपमानित वाटल्याचे त्यांनी सांगितले. केवळ जॉय यांचाच नाही, तर मी त्यांना आमंत्रित केले असल्यामुळे माझाही अपमान झाला आहे, असे नसरीन म्हणाल्या.

------------

### केवळ मतदान म्हणजे लोकशाही नव्हे,

केवळ घोषणा देण्यापुरते मर्यादित न राहता जागरूक नागरिक म्हणून भूमिका बजावली पाहिजे, असे मुंढे म्हणाले. आजच्या डिझिटल युगात रिल्स आणि सोशल मीडियामुळे एकाच गोष्टीचा सातत्याने भडिमार केला जातो. यामुळे तीच गोष्ट खरी असल्याचा आभास निर्माण होतो. अशा वातावरणात मूळ विचार दाबला जातो. आज आवाज वाढला पाहिजे की विचार? असा प्रश्न उपस्थित करत मुंढे म्हणाले की, आपला विचार जर मोठा करायचा असेल, तर आवाज लहान करावा लागेल. वाचलेली किंवा पाहिलेली गोष्ट खरंच खरी ४आहे का, हे तपासण्याची क्षमता प्रत्येक नागरिकाकडे असायला हवी. तरुणांना मार्गदर्शन करताना त्यांनी स्पष्ट केले की, आपली इतिहासात नोंद व्हावी म्हणून काम करू नका. इतिहास केवळ अशाच व्यक्तींना लक्षात ठेवतो, ज्यांनी समाजाला पुढे नेण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. यासाठी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नेल्सन मंडेला आदिंची प्रेरक उदाहरणे उपस्थितांसमोर ठेवली. यावेळी अमरावतीसह राज्यातील इतर जिल्ह्यातूनही विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

----------

### कोट्यावधीचा घरकुल वाळू घोटाळा

आधारे ईटीपी तयार करून गोदावरी नदी पात्रातील वेगवेगळ्या ठिकाणांवरून तब्बल २५,६४२ ब्रास वाळूचा अवैध उपसा व वाहतूक केली असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी चकलांबा पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता (बीएनएस), माहिती तंत्रज्ञान अधिनियम, पर्यावरण संरक्षण अधिनियम आणि सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ च्या विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याची व्याप्ती मोठी असल्याने याचा तपास आता आर्थिक गुन्हे शाखा, बीड यांच्यामार्फत केला जात आहे. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, अटक आरोपींनी घरकुल लाभार्थ्यांच्या खात्याचा व ओटीपीचा गैरवापर केल्याचे निष्पन्न झाले असून, या प्रकरणाच्या तांत्रिक व सखोल चौकशीसाठी संबंधितांना नोटीस बजावून कागदपत्रांसह चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अवैध वाळू माफिया आणि या रॅकेटमध्ये सहभागी असणाऱ्या इतर जणांवरही लवकरच कठोर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

--------------

### राज्यभरात पावसाची विश्रांती, १५

आला आहे. त्यामुळे आता प्रशासनाने त्या अनुषंगाने पावले उचलणे गरजेचे आहे. जुलै महिन्याच्या शेवटी मुसळधार पावसाने राज्यभरात एकच कहर केल्याचे चित्र बघायला मिळाले आहे. अनेक भागात नदीपात्र दुथडी भरून वाहू लागले आहे. तर बहुतांश धरणांनी मर्यादा पातळी ओलांडली आहे. नैऋत्य मान्सूनच्या दुसऱ्या टप्प्यात (ऑगस्ट-सप्टेंबर) देशभरात सरासरीच्या ९४ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे मत ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी व्यक्त केले आहे. तर १५ ऑगस्टपर्यंत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, खान्देश व विदर्भात पावसाचा जोर कमी राहील. या काळात बहुतांश ठिकाणी केवळ हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळतील. १५ ऑगस्टनंतर मात्र राज्यभरात पुन्हा चांगल्या पावसाची शक्यता आहे, असे हवामान अभ्यासक अथ्रेय शेट्टी यांनी सांगितले. सध्या विषुववृत्तीय पॅसिफिक महासागरावर 'मध्यम एल निनो' परिस्थिती असून, मान्सूनच्या उर्वरित काळात ती अधिक तीव्र होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे पावसावर प्रतिकूल परिणाम दिसून येत असल्याचेही ते म्हणाले.

-----------

### तर पत्नीला अंतरीम पोटगी

पतीने सीआरपीसी कलम १२५ (४) अंतर्गत अर्ज दाखल करून दावा केला की, पत्नी व्यभिचारात राहत असल्याने ती पोटगीस पात्र नाही. आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ पतीने छायाचित्रे आणि डिजिटल पुरावे सादर केले. कनिष्ठ न्यायालयाने पतीचा कलम १२५(४) अंतर्गतचा अर्ज अंतिम सुनावणीच्या टप्प्यावरच निश्चित केला जाऊ शकतो, असा निर्णय दिला. तसेच सादर केलेल्या डिजिटल पुराव्यांची सत्यता मुख्य खटल्याच्या पुराव्यांच्या टप्प्यावरच तपासता येईल, असे नमूद करत कनिष्ठ न्यायालयाने पत्नी आणि मुलासाठी प्रत्येकी २५,००० रुपये अंतरीम पोटगी मंजूर केली. राजस्थान उच्च न्यायालयानेही कनिष्ठ न्यायालयाचा हा निर्णय कायम ठेवला. याविरोधात पतीने सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. कनिष्ठ न्यायालय व उच्च न्यायालयाच्या दृष्टिकोनाशी सर्वोच्च न्यायालयाने असहमती दर्शवली. खंडपीठाने स्पष्ट केले की, ''कलम १२५ (४) ची अट अशी आहे की, व्यभिचार सिद्ध झाल्यास पत्नी अंतरीम अथवा अंतिम अशा कोणत्याही पोटगीस पात्र राहत नाही. त्यामुळे पतीने कलम १२५(४) अन्वये अर्ज दाखल करून पहिल्याच टप्प्यात पुराव्यांच्या आधारे आरोप प्राथमिक दृष्ट्या सिद्ध केला, तर अंतरीम पोटगीला कायदेशीर अडसर निर्माण होतो.''कनिष्ठ न्यायालयाने कलम १२५ (४) वरील अर्जावर निर्णय न देता तो प्रलंबित ठेवणे चुकीचे होते, असे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने सदर अर्ज गुणवत्तेच्या आधारे पुन्हा नव्याने निश्चित करण्यासाठी कनिष्ठ न्यायालयाकडे परत पाठवला आहे.

-----------

### दोन्ही राष्ट्रवादीचा संसार

आणि नगरसेवकांची वाढती नाराजी यामुळे पक्षात अंतर्गत असंतोष उफाळून आला. परिणामी, भाजपचे डॉ. योगेश क्षीरसागर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर हे दोन्ही क्षीरसागर बंधू नगरपालिकेच्या माध्यमातून पुन्हा एकदा एकत्र येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या घडामोडींमुळे आमदार विजयसिंह पंडितांच्या राजकीय रणनीतीला मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे. आमदार विजयसिंह पंडित यांनी नगरपालिकेच्या माध्यमातून आगामी विधानसभा निवडणुकीची पायाभरणी सुरू केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. मात्र, नगरपालिकेत बसलेला हा सुरुवातीचा झटका पाहता त्यांना आगामी पावले अत्यंत मोजून-मापून टाकावी लागणार आहेत. दुसरीकडे, दोन्ही क्षीरसागर बंधूंनी ''चर्चा करून योग्य तो निर्णय घेऊ,'' अशी सावध प्रतिक्रिया दिल्याने आगामी १५ ते २० दिवसांत बीडच्या राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळण्याची शक्यता आहे. बीडकरांचे लक्ष आता या राजकीय घडामोडींकडे लागले आहे. एकूणच या सर्व राजकीय घडामोडी मधून बीडकरांना पंडित आणि पंडितांना बिडकर सहा महिन्यातच समजले.

# मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दिलासा ; जायकवाडी ८०% भरले


संभाजीनगर / प्रतिनिधी

मराठवाड्याचे जीवनदायी समजल्या जाणाऱ्या जायकवाडी धरणातीलपाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत असून, शनिवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत धरणातील उपयुक्त पाणीसाठा ७९.७४ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरण आता ८० टक्के भरल्याच्या उंबरठ्यावर आले असून, यामुळे मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांच्या पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा मोठा प्रश्न जवळपास मिटल्याचे चित्र आहे.

धरणात सध्या ६१.१२ टीएमसी (१,७३१.०५८ दलघमी) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून, एकूण जलसाठा ८७.१९ टीएमसी इतका झाला आहे. गोदावरीच्या वरच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे धरणात ५० हजार १० क्युसेक वेगाने पाण्याची आवक सुरू आहे. विशेष म्हणजे, अवघ्या तीन तासांत ०.५४ टीएमसी पाण्याची भर पडल्याने धरणातील जलसाठा वेगाने वाढत आहे. सध्या धरणाच्या सांडव्यावरून कोणताही विसर्ग सुरू नसला तरी सिंचनासाठी कालव्यांतून पाणी सोडण्यात येत आहे. उजव्या कालव्यातून १,१०० क्युसेक तर डाव्या कालव्यातून ७०० क्युसेक, असा एकूण १,८०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे लाभक्षेत्रातील सिंचन व्यवस्थेलाही गती मिळत आहे. जुलै महिन्याच्या अखेरपासून मराठवाडा आणि गोदावरी खोऱ्यात झालेल्या दमदार पावसाचा थेट फायदा जायकवाडी धरणाला झाला आहे. सलग वाढणाऱ्या आवकेमुळे धरणाचा जलसाठा दिवसागणिक वाढत असून, काही दिवसांपूर्वी ७० टक्क्यांच्या आसपास असलेला साठा आता ८० टक्क्यांच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. जायकवाडी धरण मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी आणि इतर भागांसाठी पिण्याच्या पाण्याचा महत्त्वाचा स्रोत आहे. धरणातील पाणीसाठा वाढल्यामुळे यंदाच्या वर्षभरातील पिण्याच्या पाण्याची चिंता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. तसेच खरीप हंगामातील पिकांसाठी आणि पुढील रब्बी हंगामासाठीही सिंचनाची उपलब्धता सुधारण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या वरच्या धरणांतून होणारा विसर्ग आणि पाणलोट क्षेत्रातील मुसळधार पाऊस कायम असल्याने जायकवाडीतील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासन, जलसंपदा विभाग आणि शेतकऱ्यांचे लक्ष आता धरण ८० टक्क्यांचा टप्पा कधी पार करते आणि पुढील काळात आवक किती वाढते, याकडे लागले आहे.




## खरीप कांदा पिकाचे वेगवेगळ्या अवस्थेतील नियोजन!



सध्या खरीप कांदा लागवड होऊन एक ते दोन महिन्याचा कालावधी झालेला आहे. पीक वेगवेगळ्या अवस्थेत आहे. यावेळी पिकाला गरजेनुसार पोषक घटकांचा पुरवठा करणे गरजेचे असते. तसेच काही ठिकाणी आंतर मशागतीची कामे, तसेच कीड आणि रोग नियंत्रण करणे गरजेचे आहे. जाणून घेऊ या कांदा पिकाच्या वेगवेगळ्या अवस्थेतील नियोजन.

खरीप कांदा पिकाचे नियोजन : सध्या परतीचा पाऊस झाल्यामुळे करपा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. हे टाळण्यासाठी लवकरात लवकर शेतातून अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. पीक ३० दिवसाचे झाले असल्यास उभ्या पिकात नत्राची पहिली मात्रा २५ किलो/हेक्टर या प्रमाणात द्यावी. लावणीनंतर ४०-६० दिवसांनी पिकात हाताने खुरपणी करावी. कांद्याच्या उभ्या पिकात नत्राची दुसरी मात्रा २५ किलो/हेक्टर लावणीनंतर ४५ दिवसांनी द्यावी. रोपे लावल्यानंतर ४५, ६० आणि ७५ दिवसांनी ५ ग्रॅम/लिटर सूक्ष्म पोषक मिश्रण पानातून फवारणीद्वारे शिफारस केली जाते. नायट्रोजन लीचिंगमुळे शेतात नायट्रोजनची कमतरता होते यामुळे पाने पिवळसर दिसून येत असल्यास, नायट्रोजनची कमतरतेवर भरून काढण्यासाठी युरिया १० ग्रॅम/लिटर पाणी यांची पानांवर फवारणी करावी. सततचा पाऊस, सापेक्ष आर्द्रता (८५% पेक्षा जास्त) आणि ढगाळ स्थिती असल्यास, यामुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो अशावेळी बेनोमिल ०.२% ची प्रतिबंधात्मक फवारणी करावी. बेनोमिल फवारणीनंतर १५ दिवसांनी मॅन्कोझेब २.५ ग्रॅम/ लिटर सोबत मेथोमाईल ०.८ ग्रॅम/ लिटर सह दुसरी रोगप्रतिबंधक फवारणी करण्याची शिफारस केली जाते. यामुळे पानांवरील रोग आणि फुलकिडी यांचा प्रादुर्भाव सुद्धा टाळला जातो. फुलकिडी आणि पानांवरील रोग वरील फवारणीद्वारे पूर्णपणे नियंत्रित न झाल्यास, प्रोफोनोफॉस १ मिली/लिटर + हेक्साकोनाझोल १ ग्रॅम/ लिटरची दुसरी फवारणी केली जाऊ शकते आणि त्यानंतर फिप्रोनिल १ मिली/लिटर ची फवारणी करावी. गरज भासल्यास प्रोपिकोनाझोल १.० ग्रॅम/लिटर पाणी याप्रमाणे आधीच्या फवारणीनंतर १५ दिवसांनी करावी.

## पशुधनाच्या चाऱ्यासाठी शेवगा उत्तम पर्याय



शेवगा ही जगातील अतिशय उपयुक्त वनस्पती आहे. ही वनस्पती जलद वाढणारी आहे. उष्णकटिबंधीय प्रदेशात मानवी अन्न, पशुधनाचा चारा, औषधी उपयोग, जलशुद्धीकरण आणि रंगद्रव्ये इत्यादी करिता या वनस्पतीची लागवड करण्यात येते. शेवग्याचे हे सर्व उपयोग लक्षात घेता, शेवग्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. शेवग्याची पाने ही पशुधनासाठी उत्तम प्रकारचा चारा आहे. शेवग्याची लागवड कोरडवाहू क्षेत्रातही करता येते. या वनस्पतीत टॅनिन, ट्रायपीसीन आणि अमायलेज या घटकांचे प्रमाण अतिशय कमी असते. शेवगा या वनस्पतीचे उत्पादन (शुष्क) २४ टन प्रति हेक्टर, प्रति वर्ष मिळते. या वनस्पतीतील प्रथिनांचे प्रमाण १९.३ ते २६.४ टक्के असते. शेवग्याच्या ताज्या पानांचा विविध पशुधनाच्या आहारामध्ये समावेश करता येतो. पशुधनास शेवग्याची पाने खाऊ घातल्याने मेंढ्यांच्या वजनामध्ये वाढ, दुध उत्पादनात वाढ आणि शेळ्यांच्या पचनशक्तीमध्ये सुधारणा आढळून आलेली आहे. शेवग्याची पाने वाळवून सुद्धा पशुधनास खाऊ घालता येऊ शकतात. शेवग्याच्या पानामध्ये सर्वसाधारणपणे २१.८ टक्के प्रथिने, २२.८ टक्के तंतुमय पदार्थ, ४.१२ टक्क स्निग्ध पदार्थ, २१.१२ टक्के कर्बोदके आढळून येतात. शेवगा वनस्पतीमध्ये चांगल्याप्रकारे रोगप्रतिकारक शक्ती असते. तथापि, खूप दाटीने लागवड केल्यास, रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. असिफिड्स, पांढरी माशी, पाने खाणारी अळी या किटकांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. कडूनिंबाच्या बियापासून तयार केलेल्या अर्काची फवारणी केल्यास या किटकांचा प्रादुर्भाव आटोक्यात येतो.

पशुधनाच्या चाऱ्यासाठी चांगला पर्याय : शेवगा ही वनस्पती पशुधनाच्या चाऱ्यासाठी चांगला पर्याय आहे. शेवगा या वनस्पतीची बियापासून व कलमापासून लागवड करता येते. या वनस्पतीला तुलनात्मकदृष्ट्या पाण्याची व मूलद्रव्यांची गरज कमी असते. या वनस्पतीपासून चांगल्या प्रमाणात व उत्तम गुणवत्तेचा चारा उपलब्ध होतो. कमी पर्जन्यकाळात शेवगा या वनस्पतीपासून मिळणारा चारा पशुधनाची गरज भागवू शकतो. शेवगा या वनस्पतीची लागवड बांधावर आंतरपीक म्हणून, उष्णप्रदेशात व कमी पर्जन्यमानात करता येऊ शकते. त्यामुळे शेवगा ही वनस्पती पशुधनाच्या चाऱ्यासाठी उत्तम पर्याय आहे.

खत व्यवस्थापन : शेवगा या वनस्पतीपासून जास्तीत जास्त उत्पन्नासाठी चांगल्या प्रकारे कुजलेले शेणखत शेतात पसरणे आवश्यक आहे. १० ते १५ मे. टन शेणखत प्रतिहेक्टरी देण्यात यावे. शेवगा या वनस्पतीची उंची अडीच फूट (७५ सें.मी.) झाल्यानंतर, प्रत्येक रोपास १०० ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सुपर फॉस्फेट आणि ५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश देण्यात यावे.

कापणी कधी करावी : शेवग्याच्या पानाची कापणी ही वनस्पतीची सर्वसाधारण उंची १.५ ते २ मीटर (लागवडीनंतर ६० ते ९० दिवस) झाल्यानंतर करण्यात यावी. कापणी करीत असताना जमिनीपासून २० ते ४५ सें.मी. उंचीवर कापणी करावी. त्यामुळे नवीन अंकूर फुटण्यासा वाव मिळतो. त्यानंतरची कापणी प्रत्येकी ३५ ते ४० दिवसांनी घेण्यात यावी. शेवगा या वनस्पतीची आंतरपीक म्हणून लागवड केल्यास, २ ते ४ महिन्याच्या अंतराने कापणी करावी. अशावेळी कापणी करताना, दुसऱ्या आंतरपीकावर शेवगा या वनस्पतीच्या सावलीचा विपरीत परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी.

सुधारित जाती : तमिळनाडू कृषि विद्यापीठ, कोईमतूर या संस्थेने केलेल्या शेवगा या वनस्पतीच्या सीओ-१ आणि पीकेएम या सुधारीत जाती आहेत. याशिवाय जाफना मोरिंगा, चिंवचेरी मोरिंगा, चोमोरिंगा, याजपणाम मोरिंगा, पानमोरिंगा आणि धनराज या जाती आहेत.

## सोयाबीनवरील पाने खाणारी अळीचे नियंत्रण

सोयाबीन हे महाराष्ट्रातील प्रमुख तेलबिया पीक असून, त्यावर विविध पाने खाणाऱ्या अळ्यांचा प्रादुर्भाव आढळतो. त्यामध्ये तंबाखूवरील पाने खाणारी अळी ही सर्वाधिक नुकसान करणारी कीड आहे. या अळीचा प्रादुर्भाव वेळीच ओळखून योग्य उपाययोजना केल्यास पिकाचे मोठे नुकसान टाळता येते. या लेखातून या किडीची विविध अवस्थांतील ओळख, नुकसानाची लक्षणे व जैविक नियंत्रक घटक यांची माहिती घेतल्यास याचा चांगला फायदा होतो.

नुकसानीचे स्वरूप : अंड्यातून बाहेर पडलेल्या लहान अळ्या सुरुवातीला समूहाने पानांचा हिरवा भाग खरवडून खातात, त्यामुळे पान पातळ पांढऱ्या कागदाप्रमाणे दिसते. वाढलेल्या अळ्या पानांना मोठी छिद्रे पाडून ती जाळीदार करतात. तीव्र प्रादुर्भावात संपूर्ण पर्णसंभार फस्त करून फक्त शिराच शिल्लक राहतात. त्यामुळे प्रकाश संश्लेषणात अडथळा येऊन झाडांची वाढ खुंटते. उत्पादनात मोठी घट होते. पुढील अवस्थेत या अळ्या फुले, कळ्या तसेच कोवळ्या शेंगांवरही उपजीविका करतात. त्यामुळे आर्थिक नुकसान वाढते.

एकात्मिक व्यवस्थापन : उन्हाळ्यात खोल नांगरणी करून जमिनीतील कोष नष्ट करावेत. मुख्य पिकाभोवती एरंडी किंवा सूर्यफुलाची एक ओळ सापळा पीक म्हणून लावावी. पिकाची नियमित पाहणी करून अंड्यांचे पुंजके व समूहाने आढळणाऱ्या लहान अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात.संतुलित खत व्यवस्थापन : पतंगांच्या सर्व्हेक्षणासाठी हेक्टरी ५ कामगंध (फेरोमोन) सापळे लावून त्यामध्ये स्पोडोल्युअर प्रलोभकाचा वापर करावा. भक्षक पक्ष्यांचे संवर्धन करण्यासाठी प्रति एकर ८ ते १० पक्षिथांबे उभारावेत. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा ॲझाडिरेक्टिन (१० हजार पीपीएम) ५ मि.लि. प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. अळीच्या व्यवस्थापनासाठी एस.एल.एन.पी.व्ही. (५०० एल.ई.) ५ मि.लि. किंवा मेटारायझिम रिलेयी ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे प्रादुर्भाव दिसताच फवारणी करावी. कामगंध सापळ्यात सलग २ ते ३ दिवस प्रति सापळा ८ ते १० नर पतंग आढळल्यास किंवा फुलोऱ्यापूर्वी प्रति मीटर ओळीत १० अळ्या



किडीची ओळख : मादी पतंग पानांच्या खालच्या बाजूस १०० ते ३०० अंडी पुंजक्यांमध्ये घालते. अंडी गोलाकार, पिवळसर-क्रीम रंगाची असून, त्यावर मादीच्या उदरावरील पांढुरक्या केसांसारख्या खवल्यांचे दाट आवरण असते. त्यामुळे अंड्यांचा पुंजका कापसाच्या छोट्या बोळ्यासारखा दिसतो. अंड्यातून बाहेर पडलेल्या अळ्या सुरुवातीला फिकट हिरव्या रंगाच्या असतात. अळीची पाच इनस्टार अवस्थांमधून वाढ होत असताना त्यांचा रंग गडद काळपट-तपकिरी होतो. शरीराच्या दोन्ही बाजूंवर फिकट पिवळसर पट्टे व काळे ठिपके स्पष्ट दिसतात. पूर्ण वाढ झालेली अळी जाड, चपळ व चमकदार तपकिरी डोक्याची असून, धोका जाणवताच वेटोळे घालते किंवा झपाट्याने खाली पडते. पूर्ण वाढ झालेल्या अळ्या जमिनीत सुमारे २ ते ८ सेंमी खोलीवर मातीची कोषिका तयार करून त्यामध्ये कोषावस्था धारण करतात. कोष गुळगुळीत, चमकदार व गडद लालसर-तपकिरी रंगाचा असतो. प्रौढ पतंग मध्यम आकाराचा व प्रामुख्याने निशाचर असतो. पुढील पंख तपकिरी रंगाचे असून, त्यावर मलई रंगाच्या लहरी रेषा, वलये व मूत्रपिंडाकृती ठिपके दिसतात. मागील पंख रुपेरी-पांढरे ते फिकट करडे असून त्यांच्या कडा गडद तपकिरी असतात. विश्रांतीच्या वेळी पतंग पंख छपरासारखे मिटून बसतो. मादी पतंग नरापेक्षा आकाराने किंचित मोठा व अधिक भरदार असतो. अंडी अवस्था ४ ते ५ दिवसांची असते. त्यानंतर अळीच्या ५ ते ६ इन्स्टार अवस्था १७ ते २० दिवसांत पूर्ण होतात. पूर्व-कोष अवस्था २ ते ३ दिवस, तर कोष अवस्था ८ ते १० दिवसांची असते. त्यानंतर प्रौढ पतंग बाहेर पडतो. प्रौढाचे आयुष्य ५ ते ६ दिवस असून, संपूर्ण जीवनक्रम साधारण ३६ ते ४४ दिवसांत पूर्ण होतो.

रासायनिक नियंत्रण : प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीपेक्षा अधिक दिसल्यास, (फवारणी प्रमाण : प्रति लिटर पाणी). क्लोरअँन्ट्रानिलीप्रोल (१८.५० टक्के एस.सी.) ०.३ मि.लि. किंवा फ्ल्युबेंडायअमाइड (३९.३५ टक्के एस.सी.) ०.३ मि.लि. किंवा स्पिनेटोराम (११.७० टक्के एस.सी.) ०.९ मि.लि. किंवा

ल्युफेन्युरॉन (४ टक्के) अधिक इमामेक्टीन बेन्झोएट (१.५ टक्का ई.सी.)( संयुक्त कीटकनाशक) १.६६ मि.लि. किंवा नोव्हॅल्युरॉन (५.२५ टक्के) अधिक इंडोक्साकार्ब (४.५० टक्के एस.सी.) (संयुक्त कीटकनाशक) १.६५ मि.लि. किंवा क्लोरअँन्ट्रानिलीप्रोल (१५ टक्के) अधिक इमामेक्टीन बेन्झोएट (७.५ टक्के एस.सी.) (संयुक्त कीटकनाशक) ०.४ मि.लि.




### महत्वाच्या घटना

१४९२ : इटालियन खलाशी ख्रिस्तोफर कोलंबस हे आपल्या तीन जहाजांसह स्पेनहून भारताच्या शोधात निघाले.
१७८३ : जपानमधील माउंट असामा ज्वालामुखीचा उद्रेक होऊन सुमारे ३५,००० जण मृत्यूमुखी पडले.
१८११ : जंगफ्राऊ शिखर या बर्नीज आल्प्स पर्वतरांगेतील तिसरे सर्वोच्च शिखराची जोहान रुडॉल्फ आणि हायरोनिमस मेयर यांनी पहिली चढाई केली.
१९०० : 'द फायरस्टोन टायर अँड रबर कंपनी' ची स्थापना झाली.
१९१४ : बव्हेरियाचे राजे लुडविक यांच्याकडे आपणांस सैन्यात दाखल करून घ्यावे असा हिटलरने अर्ज केला आणि त्याची सैन्यात नियुक्तीझाली.
१९३६ : आंतरमहाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक ही स्पर्धा आयोजित करणार्या 'महाराष्ट्रीय कलोपासक' या संस्थेची हौशी आणि प्रायोगिक नाट्यसंस्था सुरू झाली. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार या संस्थेचे पहिले अध्यक्ष झाले.
१९४६ : सांताक्लॉज लँड, थीम पार्क जगातील पहिले थीम पार्क सांताक्लॉज, इंडियाना, अमेरिका येथे उघडले.
१९४८ : भारतीय अणूऊर्जा आयोगाची स्थापना झाली.
१९६० : नायजरला (फ्रान्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९७७ : -८० कॉम्पुटर टँडी कॉर्पोरेशन कपंनीने जगातील पहिल्या मोठ्या प्रमाणात विकलेल्या वैयक्तिक संगणकांची घोषणा केली.
१९८५ : प्रसिद्ध भारतीय समाजसेवक व सक्रीय कार्यकर्ते बाबा आमटे यांना सार्वजनिक सेवेसाठी रॅमन मॅग्सेसे पुरस्कार प्रदान करण्यात आला.
१९९४ : सहज सोप्या व गोड कविता आणि सूक्ष्म व मार्मिक वर्णनात्मक लेख यांद्वारे हिन्दी साहित्याची अमूल्य सेवा करणारे डॉ. हरिवंशराय बच्चन यांना उत्तर प्रदेश सरकारतर्फे विषेश पुरस्कार जाहीर.
१९९४ : संगीतकार अनिल विश्वास यांना मध्य प्रदेश सरकारचा 'लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९७ : स्काय टॉवर, ऑकलंड, न्यूझीलंड या दक्षिण गोलार्धातील सर्वात उंच फ्री-स्टँडिंगइमारतीचे उदघाटन.
२००० : मल्याळी दिग्दर्शक शाजी एन. करुण यांना फ्रेन्च सरकारने 'नाईट ऑफ आर्टस अँड लेटर्स' पुरस्काराने सन्मानित केले.
२००४ : राज्यपाल महंमद फझल यांच्या हस्ते सोलापूर विद्यापीठाचे औपचारिक उद्घाटन झाले. १ ऑगस्ट २००४ रोजी या विद्यापीठाची स्थापनाझाली होती.
२००४ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने आपला मैसेंजर हा उपग्रह बुध ग्रहाकडे प्रक्षेपित केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८६ : मैथिलिशरण गुप्त हिन्दी कवी. त्यांचे सुमारे ४० स्वतंत्र ग्रंथ आणि ६ अनुवादित ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांच्या 'भारतभारती' या काव्यग्रंथामुळे त्यांना राष्ट्रकवी म्हणून मान्यता मिळाली. (मृत्यू: १२ डिसेंबर १९६४)
१८९८ : उदयशंकर भट्ट आधुनिक हिंदी नाटककार, एकांकिकाकार, कवी आणि कादंबरीकार. त्यांनी पंजाब विद्यापीठातून'शास्त्री' आणि कलकत्ता विद्यापीठातून 'काव्यतीर्थ' या उपाध्या मिळवल्या. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९६६)
१९०० : क्रांतिसिंह नाना पाटील स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, 'पत्री सरकार'चे (प्रति सरकार) संस्थापक आणि कम्युनिस्ट पक्षाचे खासदार (मृत्यू: ६ डिसेंबर १९७६)
१९१६ : शकील बदायूँनी गीतकार आणि शायर (मृत्यू: २० एप्रिल १९७० मुंबई)
१९२४ : लिऑन युरिस अमेरिकन कादंबरीकार (मृत्यू: २१ जून २००३)
१९३६ : पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या घराण्यातील शास्त्रीय ठुमरी गायक पंडित छन्नूलाल मिश्रा यांचा जन्मदिन.
१९३७ : फ्रेंच ओपन ग्रँड स्लॅम स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे विजेता स्पॅनिश टेनिसपटू आंद्रेस गिमेनो टोलागिरा यांचा जन्मदिन.
१९३९ : भारतीय क्रिकेटपटू अपूर्व सेनगुप्ता यांचा जन्म.
१९५६ : बलविंदरसिंग संधू १९८३ च्या क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघातील क्रिकेटपटू
१९६० : भारतीय क्रिकेटपटू गोपाल शर्मा यांचा जन्म.
१९८४ : सुनील छेत्री पद्मश्री व अर्जुन पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय व्यावसायिक फुटबॉलपटू व कर्णधार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९२ : औद्योगिक क्रांतीच्या काळातील अग्रणी इंग्रज शोधक व उद्योजक रिचर्ड आर्कराईट यांचे निधन.
१९०८ : पटना येथील खुदाबक्श ग्रंथालयाचे संस्थापक मौलवी खुदाबक़्श खान यांचे निधन.
१९२९ : फोनोग्राफ चे शोधक एमिल बर्लिनर यांचे निधन. (जन्म: २० मे १८५१)
१९३० : व्यंकटेश बापूजी केतकर विख्यात गणिती व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्योतिर्विद (जन्म: १२ जानेवारी १८५४)
१९५७ : देवदास गांधी पत्रकार, 'हिन्दुस्तान टाइम्स'चे संपादक, महात्मा गांधींचे चिरंजीव (जन्म: २ आक्टोबर? १९०० दरबान, दक्षिण अफ्रिका)
१९९३ : स्वामी चिन्मयानंद सरस्वती भारतीय हिंदू अध्यात्म नेते आणि अद्वैत वेदांत, भगवद्गीता, उपनिषद प्रसारक (जन्म: ८ मे १९१६)
१९९३ : उत्तरप्रदेश मधील हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशनचे सक्रीय सदस्य व क्रांतिकारक राम प्रसाद बिस्मिल यांचे निकटवर्तीय प्रेम किशन खन्ना यांचे निधन.
२००७ : सरोजिनी वैद्य लेखिका (जन्म: १५ जून १९३३)
२०२० : जॉन ह्यूम आयरिश राजकारणी नोबेल पुरस्कार (जन्म: १८ जानेवारी १९३७)







# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आधार प्रमाणीकरणाला वेग

## ३७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांची प्रक्रिया पूर्ण

जालना। प्रतिनिधी

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत जालना जिल्ह्यात कर्जमाफीची प्रक्रिया वेगाने सुरु असून, यासंदर्भात शेतकऱ्यांनी पहिल्या टप्प्यातील आलेल्या यादीमधील नावाप्रमाणे केवायसी केली आहे या संदर्भात शासनाकडून कर्ज खात्यामध्ये पैसे जमा झाल्या नसल्यामुळे नवीन पीक कर्ज देण्यास अडचण येत आहे यासंदर्भात जिल्हा उपनिबंधक श्री रोडगे यांना विचारले असता ते म्हणाले की लवकरच शेतकऱ्याच्या पीक कर्जाचे पैसे बँक खात्यामध्ये जमा होणार आहे अशी माहिती देण्यात आली. पहिल्या टप्प्यात १ लाख ७ हजार ५०५ कर्जखाती आधार प्रमाणीकरणासाठी पोर्टलवर उपलब्ध करण्यात आली आहेत. यापैकी ३१ जुलैपर्यंत ३७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन मोफत आधार प्रमाणीकरण करुन कर्जमाफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी श्री शशिकांत हदगल व जिल्हा उपनिबंधक श्री





विष्णू रोडगे यांनी पत्रकार पत्रकार परिषद मध्ये माहिती दिली.

राज्य शासनाने दि. २ जून २०२६ रोजी शासन निर्णयाद्वारे ही योजना जाहीर केली असून, दि. १५ जुलै २०२६ रोजीच्या पूरक शासन निर्णयातून काही महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. या योजनेत कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना आणि प्रोत्साहनपर लाभ असे तीन प्रमुख घटक समाविष्ट आहेत. योजनेनुसार दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत आणि ३१ मार्च २०२६ रोजी अस्तित्वात असलेल्या पीक कर्जासाठी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम ३१ मार्च २०२७ पूर्वी संबंधित बँकेत जमा केल्यास त्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.

याशिवाय २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्ज घेऊन मुदतीत परतफेड केलेल्या तसेच २०२५-२६ मधील कर्जाचीही वेळेत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना किमान ५ हजार ते कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. जिल्ह्यातील बँकांनी २ लाख ३ हजार २८३ कर्जखात्यांची माहिती महा-आयटी प्रणालीवर अपलोड केली आहे. त्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची १६ हजार ९६८ तर व्यापारी बँकांची १ लाख ८६ हजार ३१४ कर्जखाती आहेत. राष्ट्रीयकृत व ग्रामीण बँकांमधील अनुत्पादित कर्जखात्यांसाठी शासनाने हेअरकट सवलत लागू केली आहे. त्यामुळे काही कर्जदारांच्या नावापुढे प्रत्यक्ष थकबाकीपेक्षा कमी तडजोडीची रक्कम दिसत. आहे. दि. ३० सप्टेंबर २०२१ किंवा त्यापूर्वी एनपीए झालेल्या खात्यांना ३५ टक्के, त्यानंतरच्या कालावधीनुसार ४५, ५५, ७० आणि ८५ टक्के तडजोडीची रक्कम निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणताही गैरसमज न करुन संबंधित बँकेत माहितीची खातरजमा करावी, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दि. २५ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या पहिल्या यादीत १ लाख ७ हजार ५०५ कर्जखात्यांचा समावेश असून त्यात ९ हजार ५७१ सहकारी बँकांची आणि ९७ हजार ९३४ व्यापारी बँकांची कर्जखाती आहेत. या टप्प्यात दोन लाख रुपयांपर्यंत थकबाकी असलेल्या खात्यांचा समावेश करण्यात आला असून, उर्वरित व दोन लाखांपेक्षा अधिक कर्जखाती पुढील याद्यांमध्ये प्रकाशित करण्यात येणार आहेत. यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी यादीतील विशिष्ट क्रमांक आणि आधार कार्ड घेऊन जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जावे. पोर्टलवरील आधार क्रमांक, कर्ज खाते व थकबाकीची माहिती तपासून ती योग्य असल्यास आधार प्रमाणीकरण करावे. माहिती चुकीची असल्यास असहमती नोंदवता येणार असून त्यानंतर संबंधित तक्रार ऑनलाईन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविली जाईल. पडताळणीनंतर आवश्यक दुरुस्ती करुन माहिती पुन्हा पोर्टलवर उपलब्ध करुन दिली जाणार आहे. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, आधार प्रमाणीकरणासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. ही सेवा पूर्णपणे मोफत असल्याने कोणत्याही सेवा केंद्र चालकाला पैसे देऊ नयेत. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल. त्यारनंतर संबंधित कर्ज खाते नियमित होऊन शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होईल, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी श्री शशिकांत हदगल व जिल्हा उपनिबंधक विष्णू रोडगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## || थोडक्यात

### बलात्कार प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता खंडपीठात कायम

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील खोकरमोहा परिसरातील मालकाचीवाडी येथील रहिवासी असणाऱ्या दोन व्यक्तींची एका बलात्कार प्रकरणातील आरोपातून निर्दोष मुक्तता खंडपीठाने कायम केली आहे. या संदर्भात अधिक माहिती अशी की,२नोव्हेंबर१९९९रोजी फिर्यादिच्या तक्रारी नुसार शिरूर तालुक्यातील खोकरमोहा परिसरातील मालकाचीवाडी येथील रहिवासी असणाऱ्या नवनाथ सानप व उध्दव सानप या दोन व्यक्तींवर सतत बलात्कार केल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. या प्रकरणी शिरूर कासार पोलिसांनी तपास करून सदर प्रकरण न्यायालयात दाखल केले होते.सदर प्रकरणी आरोपींची बीड जिल्हा न्यायालयात निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. जिल्हा न्यायालयाच्या निकाला विरोधात सरकारी पक्षातर्फे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती.सदर प्रकरणी खंडपीठात सुनावणी झाली असता मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सरकारी पक्षातर्फे दाखल करण्यात आलेले अपील फेटाळले व या प्रकरणातील आरोपींची निर्दोष मुक्ततेचा जिल्हा न्यायालयाचा निर्णय कायम केला.आरोपींच्या वतीने प्रसिद्ध विधिज्ञ राजेंद्र हांगे, अँड अनिरूध्द हांगे, अँड हर्षवर्धन हांगे यांनी बाजू मांडली.

### चंदनझिरा पोलीस ठाण्याचे नवीन ठाणे प्रमुख पो.नि. बिडवे

जालना। प्रतिनिधी



भोकरदन पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांची बदली झाली पण भोकरदन पोलीस स्टेशनला नवीन पोलीस निरीक्षक देण्यात आले नाही आता कोणाला चार्ज देण्यात येतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय व आर्थिक गुन्हे शाखा. सायबर विभाग , स्थानिक गुन्हे शाखा या विभागामध्ये अनेक वर्षापासून पोलीस कर्मचारी असल्याचे बोलल्या जात आहे. यामुळे काही पोलीस कर्मचाऱ्यावर अन्याय होत असल्याचे दिसून येत असल्याचे समजते. भोकरदन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांची चंदनझिरा पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली असून यापूर्वी या पदावर कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांची पदेनियुक्ती झाल्यामुळे आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस उपअधीक्षक पदावर पदोन्नतीने बदली झाल्यामुळे चंदनझिरा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांचे पद रिक्त झाले होते. चंदनझिरा पोलीस ठाण्यात बदली करून घेण्यासाठी काही अधिकारी गेल्या दोन दिवसांपासून प्रयत्नशील होते.

### वै.हभप महादेव महाराज यांची पुण्यतिथी

भाविक भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे: शिवाजी महाराज

कोळगाव । प्रतिनिधी



श्री क्षेत्र नारायणगडाचे आठवे महंत वै.ह.भ.प.महादेव महाराज यांची पुण्यतिथी दरवर्षी प्रमाणे यंदाही दि.३ ऑगस्ट रोजी श्री क्षेत्र नारायणगड येथे साजरी करण्यात येणार आहे.यावर्षी पुण्यतिथी निमित्त हभप रेधंवे बापू महाराज यांचे हरिकिर्तन व महाप्रसाद वाटप होणार असून भाविक भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्रीक्षेत्र नारायणगड मठाधिपती महंत गुरूवर्य शिवाजी महाराज यांनी केले आहे.श्री क्षेत्र नारायणगडाचे आठवे महंत हभप महादेव महाराज यांची पुण्यतिथी दरवर्षी प्रमाणे यंदाही साजरी करण्यात येणार आहे.दि.३ ऑगस्ट रोजी सकाळी आकरा ते एक हभप रेधंवे बापू महाराज यांचे हरि किर्तन होणार आहे.त्यांनतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. श्रीक्षेत्र नारायणगड परिसरातील भाविकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीक्षेत्र नारायणगडाचे महंत गुरूवर्य शिवाजी महाराज यांनी केले आहे. वै.हभप महादेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन उत्तधिकारी हभप संभाजी महाराज व गुरूवर्य शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले असून भाविक भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहनही श्री क्षेत्र नारायणगड संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## अंबड येथे आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी!

अंबड। प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या दि.१ऑगस्ट रोजी १०६ व्या जयंतीनिमित्त अंबड येथील पुतळ्यास ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांसह शहरातील शासकीय अधिकारी, कर्मचारी, नगरसेवक, व्यापारी, पत्रकार बांधव व नागरिकांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सकाळपासूनच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी अनेकांनी मोठी गर्दी करून मंडपात बसून शाहीर कैलास थोरात यांच्या कलापथकाच्या माध्यमातून आयोजित केलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व क्रांती गुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या जीवन चरित्रावरील गीतांचे श्रवण करून आनंद



घेतला.

यावेळी , जिल्हा समाज कल्याण विभागाच्या राठोड मॅडम, नगरसेवक फेरोज शेख, विठ्ठलसिंह राणा , सुहास सोडणी, जाकेर डावरगावकर, बाळू भाऊ खरात, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल तूपसौंदर या समयोचित प्रसंगी माजी आमदार शिवाजीराव चौथे, उपविभागी पोलीस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ, नगरसेवक केदार दादा कुलकर्णी, राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, नगरसेवक ॲड. अफरोज पठाण, सामाजिक कार्यकर्ते भारत जाधव, शिवाजीराव घुले, रविंद्र कारके यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर जमलेल्या जनसमुदायासमोर मार्गदर्शन केले.

दरम्यान यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके यांनी अन्नदानासह एमपीएससी साठी उपयुक्त असलेल्या पुस्तकांचे मातंग समाजातील हुशार विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वाटप केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश कारके यांनी केले तर राहुल कारके यांनी उपस्थित प्रमुख पाहुणे व जमलेल्या जनसमुदायाचे आभार मानले.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या शांततेत पार पाडण्यासाठी जयंती उत्सव समितीच्या मंगेश कारके, राहुल कारके, यशवंत कारके, अभिजीत शिरगुळे, निलेश जाधव, ईश्वर जाधव, महेश जाधव, मंगेश राक्षे, मातंग संघर्ष योद्धा रअरविंद शिरगुळे यांच्यासह आणि काही कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्सव समितीच्या वतीने सायंकाळी ७ ते १० वाजेपर्यंत शहरातून साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची रथयात्रेद्वारे डीजेचे तालात फटाक्यांच्या आतिषबाजी व घोषणाबाजी करत मोठ्या उत्साहात तसेच जल्लोषात शांततेच्या मार्गाने शहरातून मिरवणूक काढण्यात आली.

## प्रलंबित तक्रारींवर दोन महिन्यांत अंतिम कारवाई करा

औरंगाबाद खंडपीठाचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथील प्रलंबित तक्रारींवर आठ आठवड्यांच्या आत अंतिम निर्णय घेण्याचे स्पष्ट निर्देश औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. या संदर्भात अधिक माहिती अशी की,याचिकाकर्ते श्री. योगेंद्र उपेंद्र सांगळे यांनी औरंगाबाद खंडपीठातील ज्येष्ठ विधिज्ञ श्री. राजेंद्र. ग. हंगे यांच्यामार्फत रिट याचिका क्र. ८०५५/२०२६ दाखल केली होती. यात त्यांनी दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्यमंत्री सचिवालय कक्ष / जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे दाखल केलेल्या तक्रारीबाबत तसेच त्यानंतर दि. १३ ऑक्टोबर २०२५, ९ जानेवारी २०२६ व ५ मे २०२६ रोजी दाखल केलेल्या तक्रार-अर्जाबाबत कारवाई होत नसल्याची बाब मांडली होती.या प्रकरणी खंडपीठात सुनावणी झाली असता या प्रकरणी

न्यायालयाने निरिक्षण नोंदवले की, प्रतिवादी क्र. २ विभागीय आयुक्त नाशिक यांनी दि. ४ मार्च २०२६ रोजी दिलेल्या निर्देशांनंतरही प्रतिवादी क्र. ३ जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनी सदर तक्रारींवर आजतागायत निर्णय घेतलेला नाही. न्यायमूर्ती श्री. नितीन बी. सुर्यवंशी व न्यायमूर्ती श्री. आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठाने २३ जुलै २०२६ रोजी याचिका निकाली काढताना जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना आदेश दिला की, याचिकाकर्त्याची दि. १७/०८/२०२४ ची तक्रार व त्यानंतरच्या तक्रारींवर (जर आधीच निर्णय झालेला नसेल तर) गुणवत्तेनुसार आठ (८) आठवड्यांच्या आत निर्णय घ्यावा. हा कालावधी या आदेशाची प्रत प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील. याचिकाकर्ताची बाजू ज्येष्ठ विधिज्ञ राजेंद्र हंगे औरंगाबाद उच्च न्यायालय यांनी मांडली. याचिकाकर्ते श्री. योगेंद्र सांगळे यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आता लवकरच अंतिम कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.


## उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांची 'हाग्रॉक्स दिल्लीमध्ये ऐतिहासिक कामगिरी

अंबड। प्रतिनिधी

अंबडचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांनी प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच जागतिक फिटनेस स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत अंबडचे नाव उंचावले आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या 'मास्टर्स युनियन हाग्रॉक्स दिल्ली २०२६' या जागतिक दर्जाच्या फंक्शनल फिटनेस स्पर्धेत त्यांनी ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. पारधी यांनी ही अत्यंत सेकंदांत पूर्ण करत आपली शारीरिक क्षमता, मानसिक ताकद आणि जिद्द सिद्ध केली. हाग्रॉक्स ही जगातील सर्वाधिक आव्हानात्मक फिटनेस स्पर्धपिंकी एक मानली जाते. यात ८ किलोमीटर धावण्यासोबत प्रत्येक एक किलोमीटरनंतर आठ कठीण फंक्शनल वर्कआउट्स पूर्ण करावे लागतात.

स्पर्धेत १५२ किलोचे स्लेड ढकलणे, १०२ किलोचे स्लेड ओढणे, किलोचे स्लेड ढकलणे , रोइंग, ब्रॉड जंप बर्पीज, जड सँडबॅग लंजेस आणि १०० वॉल बॉल्स यांसारख्या आव्हानात्मक प्रकारांचा समावेश होता.

जगातील ५२ देशांतील २० हजारांहून अधिक खेळाडूंच्या उपस्थितीत पारधी यांनी ही उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाचे श्रेय त्यांनी पत्नी इंद्रायणी पारधी (आहार व मानसिक आधार), जालना





जिल्हाधिकारी आशिमा मित्तल (प्रशासकीय पाठबळ व सुटीची मंजुरी) तसेच वर्ल्ड थलेटिक्स कोच शिव यादव यांच्या मार्गदर्शनाला दिले. प्रशासकीय सेवेत कार्यरत असतानाही आरोग्य, शिस्त आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर मिळवलेले हे यश तरुणांसाठी प्रेरणादायी असून, उमाकांत पारधी यांच्या या कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## कैलास गोरंट्याल यांची जेपीसी बँकेला भेट

### बँकेची प्रगती आणि कामकाजावर व्यक्त केले समाधान

जालना। प्रतिनिधी

जालना पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेला शनिवार दि. १ ऑगस्ट रोजी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी संचालक मंडळाशी संवाद साधून बँकेची प्रगती आधुनिक बँकिंग सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले.यावेळी बोलताना श्री. गोरंट्याल म्हणाले की, जालना पीपल्स बँक ही आमची जुनी बँक आहे. आमचे पूर्वज आणि आमची स्वतःची खाती याच बँकेत होती. मागील काळात बँकेसमोर काही आव्हाने होती, परंतु विद्यमान संचालक मंडळाने गेल्या वर्षांपासून अथक परिश्रम करून बँकेला सावरले आहे. बँकेचे हे काम कौतुकास्पद असून, संचालक मंडळ आणि कर्मचारी पूर्ण क्षमतेने काम करत आहेत. बँकेने स्वीकारलेले आधुनिक तंत्रज्ञान आणि ग्राहकाभिमुख धोरणामुळे बँकेची प्रगती अधिक वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



प्रास्ताविकपर बँकेचे चेअरमन सतीश पंच म्हणाले की, जालना पीपल्स बँक ही १०९ वर्षे जुनी बँक असून, जालना शहराची व्यापारी बँक म्हणून ओळख आहे. जुने उद्योजक, व्यापारी तसेच आजचे नवीन उद्योजक या सर्वांचा बँकेवर विश्वास आहे. सध्या बँकेने युपीआय, आयएमपीएस यांसारख्या आधुनिक सुविधा सुरू केल्या आहेत. लवकरात कामकाजात एआयचा वापर केला जाणार आहे. ठेवीदार, शेअर होल्डर आणि कर्जदार यांची संख्या सातत्याने वाढत आहे. बँकेचा पूर्वीचा नावलौकिक आणि विश्वास टिकवून ठेवण्यासाठी संपूर्ण संचालक मंडळ कार्यरत आहे, असे ते म्हणाले. यावेळी बँकेचे व्हाईस चेअरमन किशोर देवीदान, संचालक संजय भरतिया, सुभाष वाघमारे, राजकुमार दायमा, सुनील बियाणी, अनुराग अग्रवाल, सौ. वर्षा भक्कड, दीपक भुरेवाल, महाव्यवस्थापक विजय जोशी, विलास जाधव, नगरसेवक महावीर ढक्का, अशोक भगत, संतोष माधोवाले, कल्याण हरदेकर, विनोद जाधव यांच्यासह बँकेचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील बियाणी यांनी केले तर आभार प्रदर्शन किशोर देवीदान यांनी केले.

## फार्मसी विद्यार्थ्याकडे सापडल्या बाल लैंगिक शोषणाच्या ४९० क्लिप्स

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

बालकांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित डिजिटल सामग्री (चाइल्ड पॉर्नोग्राफी) बाळगणे आणि तिची विक्री/देवाणघेवाण करणाऱ्या विकृत साखळीविरुद्ध पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत एका खासगी मेडिकल दुकानात काम करणाऱ्या २८ वर्षीय बी. फार्मसी सुशिक्षित तरुणाला अटक करण्यात आली आहे. अक्षय प्रकाश गायकवाड (रा. साईनगर, भावसिंगपुरा) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे. पोलिसांना बाल लैंगिक शोषणाच्या क्लिप्सची खरेदी विक्री सुरू असल्याचा संशय आहे. यातली एकेक क्लिप चारशे ते सहाशे रुपयांना विकली जायची. या प्रकरणात अक्षयचा गायकवाडचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

राज्य महासायबर पोलिसांच्या तपासात अश्लील व्हिडिओ पाहणाऱ्या व पुढे पाठवणाऱ्या अनेक खात्यांचा सुगावा लागला होता. या माहितीच्या आधारे छत्रपती संभाजीनगरच्या सायबर पोलीस ठाण्याचे पोनि. सोमनाथ जाधव यांच्या पथकाने संशयित अक्षयला ताब्यात घेतले. आरोपीच्या मोबाईलची तपासणी केली असता, त्यात पासवर्ड प्रोटेक्टेड फोल्डरमध्ये बालकांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित तब्बल ४९० हून अधिक क्लिप्स आणि डिजिटल साहित्य आढळून आले. याप्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात अधिकृत गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपीने फार्मसीचे उच्च शिक्षण घेतले असून त्याचे वडील सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत, तर भाऊ वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत (डॉक्टर) आहे. बाल लैंगिक शोषणाच्या प्रकरणात याआधी यंत्रणांनी अक्षयचे गूगल, इंस्टाग्राम आणि टेलिग्राम खाते ब्लॉक केले होते. तरीही तो बनावट खात्यांद्वारे हे कृत्य करत असल्याचा दाट संशय आहे. क्लिप्सची विक्री: या प्रकारात मुख्य पुरवठादारांकडून सोशल मीडियाद्वारे प्रति क्लिप ₹४०० ते ₹६०० या दराने विक्री केली जात असल्याचा पोलिसांना संशय आहे. फॉरेन्सिक तपास: पोलीस आता फॉरेन्सिक टीमच्या मदतीने आरोपीच्या मोबाईलमधील डिलीट केलेला सर्व डेटा रिकव्हर करणार आहेत.

# छत्रपती संभाजी महाराज चौक ते करवा पेट्रोल पंप मार्गावरील अतिक्रमण हटवा

## दुसऱ्या दिवशीही उपोषण सुरू; आ.सोळंके,जगताप, उपनगराध्यक्ष चाऊस यांची आंदोलनस्थळी भेट; मागण्यांना वाढता पाठिंबा

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते करवा पेट्रोल पंप या प्रमुख मार्गावरील वाढत्या अतिक्रमणामुळे वाहतूक आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.या अतिक्रमणाविरोधात महापुरुष स्मारक बचाव संघर्ष समितीचा दुसरा दिवस असून, आंदोलनाला समितीच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या आमरण उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी दि ०२ ऑगस्ट रविवार रोजी विविध राजकीय, सामाजिक आणि व्यापारी संघटनांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. समितीच्या वतीने दि १ ऑगस्ट शनिवार रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून आमरण उपोषणास सुरुवात करण्यात आली.शहरातील मुख्य रस्त्यावर फळविक्रेते तसेच इतर व्यावसायिकांनी केलेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे पादचारी आणि





वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.या अतिक्रमणाबावत नागरिकांनी आणि विविध संघटनांनी अनेक वेळा नगर परिषद व प्रशासनाकडे निवेदने देऊन कारवाईची मागणी केली होती.मात्र, वारंवार मागणी करूनही प्रशासनाने ठोस पावले उचलली नसल्याने अखेर महापुरुष स्मारक बचाव संघर्ष समितीने आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी आंदोलनस्थळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनकर्त्यांना पाठिंबा दिला. आमदार प्रकाश सोळंके, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहन जगताप, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांनी आंदोलनस्थळी भेट देत उपोषणकर्त्यांशी चर्चा केली आणि त्यांच्या मागण्यांना समर्थन व्यक्त केले.यावेळी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.अतिक्रमणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावून मुख्य मार्ग मोकळा करावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे आता प्रशासन या आंदोलनाची कितपत दखल घेते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# बीडचे स्वातंत्र्य सैनिक भवन धूळखात कोट्यवधींच्या जागेवर भूमाफियांचा डोळा!

## सामाजिक कार्यकर्ते विनोद चव्हाण यांचा आक्रमक पवित्रा व प्रशासनाकडे म्युझियम उभारण्याची मागणी



बीड । प्रतिनिधी

मराठवाडा व भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी आपले प्राण पणाला लावून बलिदान दिले, अनेकांनी रक्ताचे पाट वाहिले आणि देश गुलामगिरीतून मुक्त केला. अशा सर्व हयात असणाऱ्या देशप्रेमी स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मरणार्थ व त्यांच्या सत्कार्यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने लाखो रुपये खर्च करून शहरातील भाजी मंडईमध्ये, संस्कार शाळेच्या मागे भव्य 'स्वातंत्र्य सैनिक भवन' उभारले होते.



भारत देशात व महाराष्ट्र राज्यातील अनेक शहरांमध्ये स्वातंत्र्य सैनिकांचे हक्काचे भवन बांधण्यात आले. मात्र, काळानुरूप आता हयात असणारे स्वातंत्र्य सैनिक काळाच्या पडद्याआड गेल्यामुळे, बीडमधील हे स्वातंत्र्य सैनिक भवन पूर्णपणे दुर्लक्षित आणि धूळखात पडले आहे. इमारतीच्या आजूबाजूला झाडेझुडपे वाढली असून देखभालीअभावी या ऐतिहासिक वास्तूची दुर्दशा झाली आहे.

या कोट्यवधी रुपयांच्या मोक्याच्या जागेवर आता भूमाफियांनी डोळा ठेवला असून येथे अतिक्रमण करण्याचे प्रकार समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते विनोद चव्हाण यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. बीडकरांनो आता तरी जागे व्हा! असे आवाहन करत त्यांनी जिल्हा प्रशासन तसेच स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नी, मुले, मुली व वारसांना पान ३ वर

# बुद्ध आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ वैचारिक क्रांतीचा दस्ताऐवज–डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बुद्ध आणि त्यांचा धम्म हा बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथ केवळ गौतम बुद्धांचे चरित्र नाही तर सामाजिक नैतिक मानवी मूल्यांच्या आधारावर पुनःमांडणी मांडणी केलेला बौद्ध धम्म होय असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याता तथा मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. उदगीर येथे आयोजित धम्म संकल्प अभियान २०२६ या लॉर्ड बुद्धा टीव्ही चॅनल यांच्या आयोजित कार्यक्रमात ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची धम्मक्रांती या विषयावर प्रमुख व्याख्याता म्हणून बोलत होते.




यावेळी धम्मपिठावर माजी जलसंपदा व क्रीडामंत्री संजय बनसोडे भन्ते नागाप्रकाश, भन्ते पय्यानंद थेरो, भन्ते नागसेन बोधी, भन्ते सुभीती, मराठा सेवा संघाचे प्रदीप ढगे, एस.डी.कांबळे, एम.एम.बलांडे, ललिता शेंदकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या वर्षावास कार्यक्रमाची सुरूवात गौतम बुद्ध यांना पुष्प अर्पण करून, दीपप्रज्वलन करून तसेच बोधिसत्व बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्ध वंदनेने झाली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी प्रत्येकाला आपल्या जीवनातून द्वेष मच्छर ईर्षा राग हे व्हायरस डिलीट करून मनशांतीचा सॉफ्टवेअर टाकता आलं पाहिजे आणि बौद्ध धम्मा मध्ये नेमकं हेच शिकवलं जातं. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इतर अनेक धर्मांचा विचारांचा अभ्यास केल्यानंतर प्रज्ञाशील करुणा मैत्री या मानवी मूल्यांवर आधारित असलेला बौद्ध धम्म स्वीकारला. मनुष्य हा कर्माने श्रेष्ठ होत असतो जन्माने नाही आणि आपल्या दुःखातून मुक्ती मिळवण्यापासून पान ३ वर

# पोलीस आदेशाचे उल्लंघन; डीजे वाजवणाऱ्या १६ जणांविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकी दरम्यान पोलीस प्रशासनाने डीजे न वाजवण्याचे आदेश दिले असतानाही त्याचे उल्लंघन करून मुख्य रस्त्यावर बेकायदेशीररित्या डीजे वाजविल्याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




माजलगाव शहरात दि.१ ऑगस्ट शनिवार रोजी सायंकाळी ७:०० वाजण्याच्या सुमारास रंगोली कॉर्नर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मुख्य रस्त्यावर संगनमत करून पोलीसांच्या आदेशाचे उल्लंघन करत मिरवणुकी दरम्यान डीजे वाजवला. व पोलिसांच्या आदेशाचे उल्लंघन केले आहे.त्यामुळे पोलीस आदेशाचे उल्लंघन केल्या प्रकरणी १६ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ व ३ (५) अन्वये गु.र.नं २५६/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार सोनवणे करीत आहेत.

# स्वच्छता निरीक्षक पदावरील समावेशासाठी राज्यभरातील कर्मचाऱ्यांचा एल्गार; १५ ऑगस्टला मंत्रालयासमोर आत्मदहनाचा इशारा




माजलगाव । प्रतिनिधी

राज्यातील विविध नगर परिषद व नगरपंचायतींमध्ये कार्यरत स्वच्छता निरीक्षक पदासाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या दीर्घकाळ प्रलंबित समावेशनाच्या मागणीसाठी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, आयुक्त व इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन सादर करून तातडीने न्याय देण्याची मागणी करण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून शासनाच्या निर्णयाची प्रतीक्षा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, ग्रामपंचायतीतून नगर परिषद व नगरपंचायतींमध्ये समाविष्ट झालेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी शासनाने निश्चित केलेली पात्रता, सेवा अटी व आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण केली आहे. मात्र, प्रशासकीय दिरंगाईमुळे त्यांचा स्वच्छता निरीक्षक पदावरील समावेश अद्यापही प्रलंबित असून त्यामुळे वेतन, सेवाज्येष्ठता, पदोन्नती तसेच इतर शासकीय लाभांपासून ते वंचित राहत आहेत.

कर्मचाऱ्यांनी निवेदनात शासनाचे विविध नियम, शासन निर्णय, परिपत्रके आणि पूर्वी दिलेल्या आदेशांचा दाखला देत आपल्या मागणीची कायदेशीर बाजू स्पष्ट केली आहे. यापूर्वी काही प्रकरणांमध्ये शासनाने विशेष बाब म्हणून समावेशनास मान्यता दिल्याची उदाहरणे देत, समान न्यायाच्या तत्त्वावर आपल्या प्रकरणातही त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, पात्र उमेदवारांना केवळ प्रशासकीय कारणांमुळे न्याय मिळत नसल्याचा आरोप करत पान ३ वर

# महापुरुषांच्या परिसरातील अतिक्रमण हटवून माजलगाव शहर अतिक्रमण मुक्त करा –विनायक रत्नपारखी

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील महापुरुषांच्या परिसरातील अतिक्रमण हटवण्यासाठी चालू असलेल्या महापुरुष स्मारक बचाव संघर्ष समिती उपोषणाला भाजपा शहर मंडळाचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी उपोषण स्थळी भेट देऊन जाहीर पाठिंबा दिला.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील विद्युत रोहित्र त्वरित स्थलांतरित करण्यात यावे, स्मारकाची रखडलेले विकास कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी तसेच स्मारकाभोवती संरक्षणात्मक भिंत उभी करून योग्य त्या उपाययोजना करणे , शहरातील सर्व नागरिकांना जमोकळा श्वास घेता यावा यासाठी अनेक वर्षापासून फक्त आश्वासनावर



आश्वासन देऊन अतिक्रमणे हटत नाहीत ,त्यामुळे जोपर्यंत शहरातील अतिक्रमण हटवून अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत उपोषण चालूच राहील यासह सह विविध सर्व मागण्याला पाठिंबा असल्याचे भाजपा शहर मंडळ भाजपचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी उपोषण स्थळी बोलताना व्यक्त केले.

खरं तर माजलगाव शहरात अनेक वर्षापासून खूप प्रमाणात वरचेवर अतिक्रमण वाढतच असल्यामुळे नागरिकांना चालण्यासाठीतर अडचण होतच आहे परंतु अतिक्रमणामुळे घाणीचे साम्राज्य देखील होत आहे त्यामुळे या ठिकाणी महापुरुषांच्या स्मारकांचा देखील अपमान होत आहे त्यामुळे प्रशासनाने नागरिकांच्या भावनांचा आदर करून तत्काळ निर्णय घेऊन शहरातील अतिक्रमण हटवावे नसता शांततेच्या व लोकशाही मार्गाने चालू असलेल्या उपोषणाचे रूपांतर सर्वपक्षीय विविध संघटना यासह सर्व नागरिकांना सोबत घेऊन अतिक्रमण हटाव मोहिमेमध्ये उतरू असा प्रशासनाला इशारा यावेळी बोलताना भाजपा शहर मंडळ तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी दिला.

# सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत प्राचार्य बाबासाहेब गोरे यांचा सेवानिवृत्ती समारंभ संपन्न

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील जनविकास महाविद्यालय, बनसारोळा ता केज चे प्राचार्य डॉ. बाबासाहेब मनोहरराव गोरे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभ महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.



यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे सर, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, शिक्षक आमदार विक्रम काळे, पदवीधर आमदार सतीश चव्हाण, चेअरमन रमेश आडसकर, मा. कुलगुरू देवानंद शिंदे सर, माजी कुलगुरू मधुकरराव गायकवाड सर, जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, सभापती गोविंदराव देशमुख, सयाजीराव मामा काकडे, बालासाहेब पाटील चिकटनेकर, प्राचार्य माधव गव्हाणे सर, कवी - साहित्यिक प्राध्यापक द.मा. माने सर, नरेंद्र काळे, डॉक्टर रमेश भराटे सर, राजेश्वर देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य युवराज गोरे, प्राध्यापक एन. एस पाटील, जिल्हाध्यक्ष लिंबराज सूर्यवंशी, खंडू गोरे, गालिब शेख, संयोजन समिती, महिला भगिनी, पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की आपल्या भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थान देवापेक्षाही श्रेष्ठ मानले गेले आहे. गुरु हा केवळ ज्ञान देत नाही, तर जीवन जगण्याची दिशा देतो. समाज घडवतो, राष्ट्र घडवतो आणि भविष्य घडवतो. अशा गुरुस्थानी असलेल्या डॉ. बाबासाहेब गोरे सरांचा आज आपण सन्मान करीत आहोत. डॉ. गोरे यांचा परिचय सांगायचा झाला तर तो काही मिनिटांत संपणारा नाही. ३६ वर्षांची अखंड सेवा, हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविण्याचे कार्य, जनविकास महाविद्यालयाचे यशस्वी प्राचार्य म्हणून नेतृत्व उच्च शिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदान आहे. हे केवळ पद नाहीत, तर आयुष्यभर केलेल्या तपश्चर्येची साक्ष आहेत. आज अनेक जण नोकरी करतात; पण काहीच जण ध्येयाने काम करतात. डॉ. गोरे यांनी नोकरी केली नाही, तर ज्ञानयज्ञ केला.

# प्रवाशांच्या सेवेसाठी सज्ज आष्टीचे नवे बसस्थानक

## नागरिकांच्या सुविधांसाठी आ. सुरेश धस यांच्या हस्ते लोकार्पण

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील नव्याने उभारण्यात आलेले अत्याधुनिक एसटी बसस्थानक आता प्रवाशांच्या सेवेसाठी सज्ज झाले असून, नागरिकांना येणाऱ्या अडचणी व गैरसोयी दूर करण्याच्या उद्देशाने तसेच पावसाळ्यात प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ आणि सोयीस्कर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या हस्ते बसस्थानकाचे प्रातिनिधिक स्वरूपात लोकार्पण करण्यात आले.





यावेळी बोलताना आमदार धस म्हणाले की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची 'लाल परी' ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी असून ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी, महिला, कामगार, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार वर्गासाठी एसटी सेवा अत्यंत महत्त्वाची आहे. नवीन बसस्थानकामुळे प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध होऊन प्रवास अधिक सुरक्षित आणि सुखकर होणार आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून विविध तांत्रिक कारणांमुळे रखडलेले बसस्थानक अखेर प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी, थोडे दिवस थांबा... आष्टी आणि मुर्शदपूरचा कायापालट करून दाखवू, अशी ग्वाही दिली. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, पान ३ वर

# एसआयआरसाठी अवघे काहीच दिवस शिल्लक ; नागरिकांनी मॅपिंग पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा – नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेचा अंतिम टप्पा सुरू असून प्रत्येक पात्र मतदाराची नोंद आणि मॅपिंग पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. ८ ऑगस्ट ही अंतिम तारीख असुन या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व नागरिकांना या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन परळीच्या नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.



मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा सर्वात मोठा आधार आहे. त्यामुळे कोणताही पात्र मतदार एसआयआर प्रक्रियेपासून वंचित राहू नये. ज्या नागरिकांचे मॅपिंग अद्याप झालेले नाही त्यांनी तातडीने आपल्या परिसरातील बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) यांच्याशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी. नोकरी, शिक्षण, व्यवसाय किंवा इतर कारणांनी बाहेरगावी वास्तव्यास असलेल्या नागरिकांनीही आपल्या कुटुंबीयांशी अथवा संबंधित बीएलओ यांच्याशी संपर्क साधून आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी. आज घेतलेली थोडीशी खबरदारी उद्याचा मतदानाचा अधिकार सुरक्षित ठेवेल. प्रत्येक नागरिकाने ही जबाबदारी ओळखून सहकार्य करावे. आपले कुटुंब, नातेवाईक आणि शेजारी यांनाही एसआयआर प्रक्रियेबाबत जागरूक करा. आपल्या शहरातील एकही पात्र मतदार वगळला जाणार नाही, यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असेही नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी म्हटले आहे. ८ ऑगस्ट ही अंतिम तारीख असुन परळी शहरातील नागरिकांनी उर्वरित कालावधीत बीएलओ यांना सहकार्य करून १०० टक्के एसआयआर मॅपिंग पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26